महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

समाज कल्याण आयुक्तालय, ३, चर्च रोड, पुणे- ४११ ००१.

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१३७१८६/२६१२७५६९ ई-मेल-fs-sw-edu@gov.in

अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांकरीता परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी परदेश शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती निवडीसाठी सन २०२४-२०२५ करिता पात्र विद्यार्थ्यांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

## "जाहिरात"

महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागामार्फत प्रतीवर्षी अल्पसंख्यांक समुदायातील विद्यार्थ्यांकरीता परदेशात पदव्युत्तर पदवी व पी.एच.डी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. तसेच नजिकच्या काळात योजने अंतर्गत पालकांच्या कुटूंबाच्या उत्पन्न मर्यादेत तसेच जागांमध्ये वाढ झाल्यास त्यानुसार जाहिरातीमध्ये आवश्यक ते बदल करण्याचे, सुधारणा करण्याचे व फेरअर्ज मागविण्याचे अधिकार शासन राखून ठेवीत आहे सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता पात्र विद्यार्थ्यांकडून परदेश शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. सदरचा अर्ज समक्ष किंवा पोस्टाने समाज कल्याण आयुक्तालय ,३, चर्च रोड,पुणे-४११ ००१ येथे सादर करावा.

७ (अ) परदेशी शिष्यवृत्तीकरीता मंजूर करण्यात येणारे अभ्यासक्रम :-

| Science, Technology, Engineering and Mathematics | | Medicine and Biology | Agriculture | Liberal Art & Humanities | Law & Commerce |
|---|---|---|---|---|---|
| * Permissible Courses :- P.G./ Ph.D | | * Permissible Courses :- P.G./ Ph.D | * Permissible Courses :- P.G./ Ph.D | * Permissible Courses :- P.G./ Ph.D | * Permissible Courses :- P.G./ Ph.D |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | 1. Civil | 1. M.Pharm | 1. Agriculture | 1. Sociology | 1. L.L.M. |
| 2 | Mechanical | 2. Public Health | 2. Agricultural Economics | 2. Psychology | 2. MBA in Finance/ Marketing/ H.R./ System Analysis |
| 3 | Electrical | 3. Microbiology | 3. Horticulture | 3. Philosophy | |
| 4 | Chemical | | 4. Animal Husbandry | 4. Economics | |
| 5 | Computer | | | 5. Commerce | |
| 6 | Production | | | 6. Applied Art | |
| 7 | Industrial Engg. | | | 7. Fine Art | |
| 8 | Environmental Engineering | | | 8. Literature | |
| 9 | Mining Engg. | | | | |
| 10 | Petrochemical | | | | |
| | Electronic & TC | | | | |
| | Information Technology/ Information System/ Information Science/ Computer Engineering | | | | |
| 11 | Bio-Technology | | | | |
| 12 | Genetic Engineering | | | | |
| 13 | Nano Technology | | | | |
| 14 | Industry Internet of Things (HOT) | | | | |
| 15 | Cyber Law/ Cyber Security | | | | |
| 16 | Biomedical Engg. | | | | |
| 17 | Climate Change | | | | |
| 18 | Artifical Interlligence | | | | |
| 19 | Reversible energy | | | | |
| 20 | Climate Change | | | | |
| 21 | Data Analyasis | | | | |
| 22 | Cloud Computing | | | | |
| 23 | General Science | | | | |
| 24 | Maths | | | | |
| 25 | Physics | | | | |
| 26 | Chemistry | | | | |
| 27 | Botany | | | | |
| 28 | Zoology | | | | |
| 29 | Statistics | | | | |

**योजनेचे नांव :-**

राज्यातील अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांकरीता परदेशात पदव्युत्तर पदवी व पी.एच.डी. अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती योजना.

**योजनेचा उद्देश :-**

अल्पसंख्यांक विकास विभागाच्या प्रवर्गातील मुला-मुलींना परदेशात पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका आणि संशोधनात्मक अभ्यासक्रमाचे (पी.एच.डी.) विशेष अध्ययन करण्यासाठी आर्थिक मदत देणे.

**योजनेची व्याप्ती :-**

महाराष्ट्रातील अल्पसंख्यांक विकास विभागाच्या प्रवर्गातील पदव्युत्तर पदवी आणि पी.एच.डी.साठी अद्ययावत QS World University Ranking २०० च्या आतील परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेणाऱ्या २७ विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि. २५ जुलै २०२४ च्या शासन निर्णयान्वयें शासनाने सर्व विभागाच्या परदेश शिष्यवृत्ती योजनेच्या निकषामध्ये समानता आणण्या करीता सर्वकष धोरण ठरविले आहे.

शासन निर्णय दि.२५.७.२०२४ अन्वये अल्पसंख्यांक विभागाच्या परदेश शिष्यवृत्तीसाठी ७५ विद्यार्थ्यांस मान्यता देण्यात आलेली आहे.

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

१. विद्यार्थी हा केंद्र अथवा महाराष्ट्र शासनाने धार्मिक अल्पसंख्याक म्हणून घोषित केलेल्या समुदयातील व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

२. विद्यार्थ्यांना परदेशातील अद्ययावत QS World University Ranking २०० च्या आत असलेल्या शैक्षणिक संस्था / विद्यापीठामध्ये प्रवेश मिळालेला असावा.

३. परदेशातील विद्यापीठ / शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेणारा विद्यार्थी हा पुर्णवेळ विद्यार्थी म्हणुन प्रवेशित असावा.

४. प्रवेशित अभ्यासक्रमासाठी अर्ज करतांना नमुद केलेल्या विहीत कालावधीत अभ्यासक्रम पुर्ण करणे विद्यार्थ्यावर बंधनकारक असेल. अभ्यासक्रम पुर्ण करण्यासाठी मुदतवाढ मान्य केलीजाणार नाही.

५. विद्यार्थ्याने पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना पीचएडी अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना, पीएचडीसाठी यापूर्वी महाराष्ट्र शासनाची व अन्य कोणत्याही विद्यापीठाची वा इतर कोणत्याही राज्य शासनाची वा केंद्र शासनाची वा अन्य संस्थांकडून परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती घेतलेली नसावी.

६. एकाच कुटूंबातील जास्तीत जास्त दोन मुलांना परदेश शिष्यवृत्तीचा लाभ देता येईल त्यापेक्षा जास्त मुलांना परदेश शिष्यवृत्ती लागू राहणार नाही. यासाठी पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी तसे प्रतिज्ञापत्र करुन देणे बंधनकारक असेल. एकाच कुटूंबातील कमाल पात्रता धारकाबाबत दि. २५.७.२०२४ च्या शासन निर्णयातील अटी लागू राहतील.

७. एकदा किमान शैक्षणिक अर्हता निश्चित केल्यावर विद्यार्थ्याच्या केवळ भविष्याच्या अनुषंगाने अधिक लाभ मिळू शकेल. या दृष्टीने त्या वर्षीच्या (QS World Ranking) ची गुणवत्ता क्रमवारी लक्षात घेवून विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी बनविणे दोन किंवा अधिक विद्यार्थ्यांची विद्यापीठाची क्रमवारी समान असल्यास अशा प्रसंगी त्यांच्या लगतच्या पदवी परिक्षेची गुणवत्ता लक्षात घेणे.

**वयोमर्यादा :-**

जाहिरात प्रसिध्द झालेल्या महिन्याच्या पहिल्या तारखेस पदव्युत्तर पदवीसाठी उमेदवारांचे वय ३५ वर्षा पेक्षा जास्त नसावे. तर पीएचडीच्या विद्यार्थ्यांसाठी वयोमर्यादा ४० वर्षापेक्षा जास्त नसावे. (दिनांक १ मे,२०२४ रोजीचे वय)

**उत्पन्न मर्यादा :-**

१. या योजनेतंर्गत लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांच्या/कुटूंबाचे व विद्यार्थी नोकरी करीत असल्यास त्याचे स्वतःचे उत्पन्न धरून सर्व मार्गानी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील वार्षिक उत्पन्न रु ८.०० लाखापेक्षा जास्त नसावे.

२. विद्यार्थी किंवा पालक किंवा दोन्ही नोकरीत अथवा कुटूंबातील इतर सदस्य नोकरी करीत असतील तर त्यांचे आयकर विवरणपत्र, फॉर्म नं.१६ व सक्षम प्राधिकारी (तहसिलदार पेक्षा कमी दर्जा नसलेल्या) यांच्याकडील मागील आर्थिक (सन २०२३-२४) वर्षाचे कुटुंबांचे सर्व मार्गानी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३. इतर विद्यार्थ्यांसाठी सक्षम प्राधिकारी (तहसिलदार कमी दर्जा नसलेल्या) यांच्याकडील मागील आर्थिक वर्षाचे (सन २०२३-२४) कुटुंबांचे सर्व मार्गानी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४. विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखापेक्षा जास्त नसावे.( विवाहित महिला उमेदवारांनी पतीकडील कुटुंबाचे एकत्रीत वार्षीक उत्पन्नाचा दाखला देणे आवश्यक आहे. जर विवाहित महिला उमेदवार विधवा, घटस्फोटीता

४. विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखापेक्षा जास्त नसावे.( विवाहित महिला उमेदवारांनी पतीकडील कुटुंबाचे एकत्रीत वार्षीक उत्पन्नाचा दाखला देणे आवश्यक आहे. जर विवाहित महिला उमेदवार विधवा, घटस्फोटीता असून वडीलांकडे वास्तव्यास असल्यास महिला उमेदवाराने वडीलांकडील कुटुंबाच्या उत्पन्नानुसार अर्ज केल्यास तसे कायदेशीर कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.)

**शैक्षणिक अर्हता :-**

१. परदेशातील पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदवीका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांमधून किमान ५५% गुणांसहित पदवी परिक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

२. पीएचडी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांमधून किमान ५५% गुणांसहित पदव्युत्तर पदवी परिक्षा उतीर्ण केलेली असावी.

३. परदेशातील शैक्षणिक संस्थेने Offer Letter मध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक कालावधीसाठी लागू केलेली संपूर्ण शिक्षण फी संबंधीत यंत्रणेने थेट संबंधीत शैक्षणिक संस्थेस अदा करावी.

४. ही पदवी किंवा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम त्याने अर्जाच्या दिनांकाला उतीर्ण केलेला असावा.

**अभ्यासक्रमाचा कालावधी :-**

१. पीएचडीसाठी ४ वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी यापेक्षा कमी असेल तो तथापि कोणत्याही परिस्थितीत दोन वर्षापेक्षा कमी नसावा.

२. पदव्युत्तर पदवीसाठी ३ वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी यापेक्षा कमी असेल तो. तथापि कोणत्याही परिस्थितीत २ वर्षापेक्षा कमी नसावा.

३. परदेशातील विद्यापीठ/शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेणारा विद्यार्थी हा पूर्ण वेळ विद्यार्थी म्हणून प्रवेशित असावा. तसेच अभ्यासक्रमाचा कालावधीचा कमीत कमी दोन वर्षाचा असावा.

४. एक्झीक्युटीव्ह पदव्युत्तर पदवी किंवा एक्झीक्युटीव्ह पदव्युत्तर पदविकास व अर्धवेळ अभ्यासक्रमास प्रवेशीत विद्यार्थी या योजनेसाठी पात्र असणार नाहीत.

५. परदेशी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत दोन वर्षे (दिनांकानुसार) कालावधीचाच MBA अभ्यासक्रम अनुज्ञेय राहील.भारतीय आयुर्विज्ञान परीषदेच्या संकेतस्थळावरील MD व MS अभ्यासक्रमच प्रवेशासाठी पात्र असतील.

**एकाच कुटूंबातील कमाल पात्रता धारक :-**

अ. परदेश शिष्यवृत्ती योजनेचा लाभ एका विद्यार्थ्यास फक्त एकदाच घेता येईल. मात्र, या योजनेअंतर्गत पदव्युत्तर पदवीचा अभ्यास सुरु असतांना त्या विद्यार्थ्यास डॉक्टरेट पदवी (पीएच.डी) साठी शासन निर्णयात अंतर्भूत विषयांत दर्जावाढ करण्याची संधी मिळाल्यास सदर विद्यार्थी याच योजनेअंतर्गत पुढील अभ्यासक्रमासाठी लाभ घेण्यास पात्र असेल. त्यासाठी विद्यार्थ्याने निवड समिती/ शासनास रितसर अर्ज करुन मान्यता घेणे बंधनकारक राहील. अशा प्रकरणात संबंधीत शैक्षणिक संस्थेची जागतिक क्रमवारी (QS World Ranking) त्यावेळी लागू असलेल्या शासन निर्णयाच्या मर्यादेत असणे आवश्यक आहे. मात्र अशा प्रकरणात विद्यार्थ्यास मिळणारा एकूण लाभाचा कालावधी त्यावेळी लागू असलेल्या शासन निर्णयाच्या मर्यादेतच दिला जाईल. उदा. विद्यार्थ्याने दोन वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम करतांना डॉक्टरेट (पीएच.डी) करण्यासाठी परदेशी शैक्षणिक संस्थेत दर्जावाढ प्राप्त केली तर त्या विद्यार्थ्याला शासनाने विहित प्रक्रियेव्दारे मान्यता दिल्यास त्यानंतरच्या पुढील दोन वर्षासाठी शासन निर्णयातील नमूद सर्व लाभ घेता येतील. या कालावधी नंतर होणारा पुढील संपूर्ण खर्च मात्र विद्यार्थ्याला करावा लागेल.

आ) एकाच कुटूंबातील जास्तीत जास्त दोन मुलांना परदेश शिष्यवृत्तीचा लाभ देता येईल त्यापेक्षा जास्त मुलांना परदेश शिष्यवृत्ती लागू राहणार नाही. यासाठी पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी तसे प्रतिज्ञापत्र करुन देणे बंधनकारक असेल.

इ) एका वर्षाच्या प्रवेश प्रकियेत एका कुटूंबातील दोन पाल्यांचा समावेश असल्यास प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम फेरीत जागा रिक्त राहील्यास एका कुटूंबातील दुसऱ्या पाल्यास लाभ देण्यात येईल.

**अर्ज करण्यासाठी अनिवार्य अटी :-**

१. नोकरीमध्ये असलेल्या उमेदवाराने तो जेथे नोकरी करतो त्या यंत्रणेचे (Organization/Employer) ना हरकत प्रमाणपत्र दाखल करणे अनिवार्य आहे.

२. पात्र विद्यार्थ्याने Non Judicial Stamp Paper वर Public Notary समोर विहीत नमुन्यातील हमीपत्र लिहून देणे बंधनकारक असेल.

३. अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्याचे स्वास्थ चांगले असले पाहिजे. त्याकरिता त्याने नोंदणीकृत वैद्यकीय अधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

४. विद्यार्थी शिक्षणासाठी आवश्यक असलेला कालावधी किंवा शिक्षण त्यापुर्वी पुर्ण झाल्यास जो कालावधी लागेल या दोघांपैकी जो कमी आहे त्या कालावधी पुरतेच परदेशात राहण्याचे बंधपत्र Bond राज्य शासनास तसेच परदेशातील भारतीय दुतावासास लिहून द्यावे लागेल. या आवश्यक कालावधी पेक्षा जास्त कालावधी करीता परदेशात राहण्यास विद्यार्थ्यास परवानगी मिळणार नाही.

५. उमेदवारास/विद्यार्थ्यास शासनाने विहीत करुन दिलेलया नमुन्यात Record Release Consent Form हा अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यावर द्यावा लागेल.

६. परदेशी विद्यापीठामध्ये प्रवेश घेणेसाठी स्वत: प्रयत्न करावा लागेल. त्यासाठी आवश्यक त्या सर्व पात्रता परिक्षा (उदा. GRE /TOFEL /IELTS इत्यादी )आवश्यक परिक्षा उत्तीर्ण होण्याचे बंधन असल्यास विद्यार्थ्यानी ते पूर्ण केले असले पाहिजे.

७. ज्या विद्यार्थ्यांना परदेशी शैक्षणिक संस्थांकडुन Unconditional offer Letter मिळालेले असेल त्यांनाच ही शिष्यवृत्ती अनुज्ञेय राहील. यासाठी conditional offer Letter गृहित धरले जाणार नाही. (QSWR २०० परदेशी विद्यापीठांमध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रमांसाठी सामाजिक न्याय विभागामार्फत शिष्यवृत्ती देण्यात येते. प्रत्येक विद्यापीठाचे आपआपले नियम आणि कायदे असतात. शिष्यवृत्तीसाठी प्राप्त अर्जाची छाननी करताना या विभागामार्फत केवळ विद्यापीठाने ऑफर लेटर बिनशर्त असल्याची खात्री करण्यात येत असून ऑफर लेटरमध्ये नमूद केलेल्या सविस्तर अटींशी त्याचा काहीही संबंध नसल्याने सदर अटींची पडताळणी करण्यात येत नाही. ऑफर लेटरमधील अटींबाबत विद्यापीठाशी संवाद साधणे आणि त्यांचे निराकरण/समाधान करणे ही संबंधीत विद्यार्थ्याची जबाबदारी आहे. ज्या विद्यापीठाच्या ऑफर लेटरमध्ये (Unconditional) शब्द नसेल अशाविद्यापीठाचे Unconditional offer असल्याचे पत्र/ईमेल पुरावा म्हणून सोबत जोडावा.

८. विवाहीत उमेदवाराची पत्नी/पती व मुले यांना परदेशामध्ये सोबत घेवून जाण्यासाठी कोणत्याही प्रकारचे सहाय्य दिले जाणार नाही. त्यासाठी पासपोर्ट मिळविणे, व्हिसा मिळविणे आर्थिक तरतुद करणे, परदेशातील निवास व दैनंदिन खर्चाची व्यवस्था करणेही उमेदवाराची वैयक्तीक जबाबदारी असेल.

९. नोकरी करणाऱ्या उमेदवाराने सर्व प्रशासकीय बाबी उदा. रजा, वेतन आणि इतर सेवेच्या बाबी या स्वत: प्रत्यक्षपणे निराकरीत करावयाच्या आहेत. याबाबत कोणत्याही प्रकारची सवलत शासनाकडुन मिळणार नाही.

१० (अ) अचानक उद्भवलेल्या परिस्थितीमध्ये, परदेशामध्ये शिक्षण घेत असतांना विद्यार्थ्यांस भारतामध्ये यावयाचे असल्यास त्यासाठी त्यांचे संबंधीत शैक्षणीक संस्था आणि समाज कल्याण आयुक्तालय तसेच अल्पसंख्याक विकास विभागाची पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक असेल आणि याबाबतची माहिती संबंधीत विद्यार्थी भारतीय दुतावासास कळवतील.

(ब) जेवढया कालावधीमध्ये परदेशातील शैक्षणीक संस्थेमधून दुर असेल तेवढया कालावधीचा कोणताही खर्च त्यास अनुज्ञेय होणार नाही. तथापि, तो पुन्हा त्याच शैक्षणीक संस्थेस त्याच अभ्यासक्रमाचे पुढील शिक्षण पुर्ण करण्यासाठी हजर झालेल्या दिवसापासून त्यास देय लाभ अनुज्ञेय होतील.

(क) अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांने परत त्याच परदेशी शिक्षण संस्थेमध्ये हजर न होता शिक्षण अर्धवट सोडल्यास त्यास अदा करण्यात आलेले शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, इतर शुल्क व निर्वाह भत्याची व्याजासह वसूली करण्यात येईल, याबाबतचे लेखी हमीपत्र विद्यार्थ्यांस द्यावे लागेल.

११. पासपोर्ट, व्हिसा मिळविण्याची जबाबदारी विद्यार्थ्याची असेल.

१२. उमेदवारास /विद्यार्थ्याना केवळ ज्या शैक्षणिक संस्थेमध्ये, ज्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळालेला आहे व शिष्यवृत्ती मिळाली आहे त्याच कारणासाठी व्हिसा घेणे बंधनकारक राहील.

१३. निवड झालेल्या विद्यार्थ्यास मागणी केल्यानुसार आवश्यक ती कागदपत्रे सादर करणे व आवश्यक ते करारनामा देणे बंधनकारक असेल.

१४. निवड झालेल्या विद्यार्थ्यांस त्याच्या शैक्षणिक कालावधीमध्ये जास्तीची रक्कम अदा झाली असल्यास त्याची परतफेड करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक असेल. अथवा ती वसूल करणेबाबत प्रचलित कायदे व नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, याबाबतचे हमीपत्र देणे बंधनकारक असेल.

१५. सदर शिष्यवृत्तीबाबत अल्पसंख्याक विकास विभागाच्या सर्वकष धोरणानुसार घेतलेला निर्णय अंतिम राहिल.

<u>उमेदवार/विद्यार्थ्यास मिळणारे लाभ :-</u>

परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आलेल्या विद्यार्थ्यास खालील लाभ देण्यात येतील.

१. परदेशातील शैक्षणिक संस्थेने पत्रामध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक कालावधीपासून लागू केलेली संपूर्ण शिक्षण फी, अभ्यासक्रमासाठी नजीकच्या मार्गानी इकॉनामी क्लास विमान प्रवास भाडे (परतीच्या प्रवासासह) निर्वाह भत्ता, वैयक्तीक आरोग्य विमा यावरील विद्यार्थ्यांने प्रत्यक्ष केलेला खर्च विहित केलेल्या वित्तीय मर्यादेत मूळ शूल्क भरणा पावती, प्रवासाचे मुळ तिकीट,

मुळ बोर्डिंग पास, परतीच्या प्रवासाचे तिकीट इत्यादी तपासून विद्यार्थ्याच्या बँक खात्यावर परदेशातील /भारतीय रुपयामध्ये प्रतिपूर्ती केली जाईल.

२. विद्यार्थ्यास परदेशी शिक्षण संस्थेमार्फत किंवा इतर कोणत्याही यंत्रणेमार्फत मिळणारी शिष्यवृत्ती इतर कोणत्याही प्रकारचे आर्थिक लाभ किंवा शिकविण्याबाबतचे मानधन किंवा फेलोशिप किंवा रिसर्च असोशिएट म्हणून मिळणारी ही रक्कम देय होणाऱ्या शिक्षण शुल्क वा एकूण देय रक्कमचे मधून कपात करण्यात येईल.

३. सुरुवातीस परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेणे आणि विहित कालावधीत अभ्यासक्रमपूर्ण केल्यानंतर त्वरीत कालमर्यादेत भारतात परत येण्यासाठी भारत सरकारच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे नजिकच्या मार्गाने इकॉनॉमी क्लास विमानप्रवासभाडे देण्यात येईल. त्यासाठी विमान प्रवासाचे मुळ तिकीट, मुळ बोर्डिंग पास, परतीचे प्रवास भाडे मिळण्यासाठी अभ्यासक्रम विहित कालावधीत यशस्वीपणे पूर्ण केल्याच्या पुरावा इ. कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

४. विद्यार्थ्यास परदेशात राहण्याच्या कालावधीसाठी विद्यापीठाने ठरवून दिल्यानुसार वैयक्तिक आरोग्य विमा काढणे अनिवार्य राहील

५. वरिलप्रमाणे शिक्षण शुल्क, निर्वाहभत्ता, वैयक्तिक आरोग्य विमा आणि विमान प्रवास इ. यासाठी निर्धारित केलेल्या एकूण दरापेक्षा होणारा जास्तीचा खर्च विद्यार्थी/उमेदवारास स्वत: सोसावा लागेल व अशा प्रकारचे हमीपत्र विद्यार्थ्यास व पालकास द्यावे लागेल.

६. खालील बाबींवरील खर्च अनुज्ञेय राहणार नाही :
   (I) व्हिसा अर्जावरील खर्च
   (II) विद्यार्थ्याच्या कुटूंबातील सदस्यांचा प्रवास व इतर खर्च.
   (III) नियमित शिक्षणाच्या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर कोणत्याही अभ्यासक्रम अथवा प्रशिक्षावरील खर्च
   (IV) भाषा प्रशिक्षणावरील खर्च
   (V) नियमित अभ्यासक्रमाच्या कालावधीत अतिरिक्त प्रवासाचा खर्च
   (VI) संशोधन, पुरक शैक्षणिक साहित्य, क्षेत्र भेटी, कार्यशाळा/सेमिनार, आंतरवसियता यामधील सहभागाचा खर्च
   (VII) संगणक व तत्सम शैक्षणिक साहित्य.

७. विद्यार्थ्यास वरिल लाभ मिळण्यासाठी परदेशातील प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाचे प्रत्येक वेळी उत्तीर्ण होणे बंधनकारक असून, तसे शैक्षणिक संस्था/विद्यापीठाचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, प्रगती अहवाल प्रत्येक सत्रासाठी किंवा सहा महिन्यासाठी तातडीने सादर करणे अनिवार्य आहे.

८. प्रवेशित विद्यार्थ्याने प्रत्येक सहा महिन्याच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्र, खर्चाच्या पावत्या इ. विद्यापीठ/ शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाकडून प्रमाणित करुन सादर करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय पुढील हप्ता मंजूर होणार नाही.

९. अपवादात्मक प्रसंगी, निवड समितीमार्फतची निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी/पालकांनी, परदेशी शिक्षण संस्था/विद्यापीठ, शिक्षण फी/इतर अनुज्ञेय फी स्वत: भरलेली असेल, अशा वेळी आवश्यक त्या पावत्या व पुरावे सादर केल्यानंतर, अशी रक्कम विद्यार्थ्यास देय होणाऱ्या शिष्यवृत्ती मधून विद्यार्थ्याच्या परदेशातील खात्यावर जमा करणेसाठी आहरण व संवितरण अधिकारी (DDO) हे अल्पसंख्याक विकास विभागातील अधिकारी असतील.

१०. विद्यार्थ्याने भारतात राष्ट्रीयकृत बँकेत व परदेशात अधिकृत बँकेत खाते उघडणे अनिवार्य आहे. त्याच खात्यावर त्यांना देय होणारी शिष्यवृत्ती CMP किंवा RTGS किंवा SWIFT ने अदा केली जाईल. विद्यार्थी व विद्यापीठाच्या परदेशातील बँक खात्याचा तपशिल त्यांने परदेशात जाऊन प्रवेश घेतल्यानंतर तात्काळ आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, पुणे तसेच प्रधान सचिव अल्पसंख्याक विकास विभाग यांना सादर करावा.

११. परदेशी शिक्षण संस्था/विद्यापीठाने ऑफर लेटर मध्ये संपूर्ण अभ्यासक्रम कालावधीच्या निर्धारित केलेल्या फी च्या मर्यादेतच लाभ संबंधीत विद्यार्थ्यास अनुज्ञेय होतील. भविष्यात त्यामध्ये वाढ झाल्यास परदेशातील भारतीय उच्चायुक्तालयाच्या शिफारशीनंतरच ही वाढ संबंधीत विद्यार्थ्यास अनुज्ञेय राहील.

<u>अर्ज करण्याची पध्दत :-</u>

सदर शिष्यवृत्तीसाठी मा.आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांनी प्राधिकृत केलेल्या यंत्रणेमार्फत वृत्तपत्रात तसेच शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करतील. तथापि, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता सदर प्रवेश प्रक्रियेबाबतची कार्यवाही सुरु करण्याबाबत निवड समिती निर्णय घेईल.

१. या योजनेसाठी जाहिरात देणे, ऑनलाईन ॲप्लीकेशन तयार करणे, कंत्राटी तत्वावर आवश्यक त्या नियुक्त्या या आयुक्तालयामार्फत करण्यात येतील. तथापि, आवश्यक तेथे शासनाच्या पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. या व इतर बाबींवरील होणारा खर्च आयुक्तालयाकडून अर्थसंकल्पीय मंजूर अनुदानातून करण्यात येईल.

२. सदरची योजना शासनाचे सर्वंकष धोरण व शासन निर्णयातील नियमावली, अटी व शर्तीनुसार राबविण्यासाठी आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, पुणे या प्राधिकृत करण्यात येत असून त्यांच्या निवड प्रक्रिया मार्फत राबविण्यात येईल.

३. सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत अथवा शासन निर्धारित करेल इतक्या कालावधीत विद्यार्थ्यांनी विहित नमून्यातील परिपूर्ण भरलेले अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह ऑफलाईन सादर करावेत. तसेच ऑनलाईन पोर्टल सुरु झाल्यास त्याबाबत माहिती देण्यात येईल. अभ्यासक्रमनिहाय असलेल्या क्षमतेच्या अधिन राहून, निवड समितीने निश्चित केलेली पात्र विद्यार्थ्यांची अंतिम निवड यादी साधारणत:

४. शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे हे संबंधीत विद्यार्थ्यांना कळवून त्यांच्याकडून आवश्यक ती माहिती मागविण्यात येईल. तसेच या विद्यार्थ्याची गृहचौकशी करण्यात येईल.

५. प्रत्येक सहा महिन्याने विद्यार्थ्यानी दिलेल्या शिष्यवृत्तीचे (शिक्षण फी, परिक्षा फी, निर्वाह भत्ता इ.चे) उपयोगिता प्रमाणपत्र, गुणपत्रक आणि प्रगती अहवाल आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांना तसेच प्रधान सचिव अल्पसंख्याक विकास विभाग यांना सादर केल्यानंतर समाधानकारक असल्यास पुढील ६ महिन्याची शिष्यवृत्ती अदा करण्यात येईल. प्रत्येक ६ महिन्याला विद्यार्थ्याची शैक्षणिक प्रगती अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र/ खर्चाचा अहवाल प्राप्त झाल्याशिवाय संबंधीत विद्यार्थ्यास पुढील शिष्यवृत्ती अनुज्ञेय होणार नाही.

६. सदर अर्जासोबत विद्यार्थ्याने खालील कागदपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

(I) विहित नमून्यातील परिपूर्ण भरलेला अर्ज,

(II) अर्जदार अल्पसंख्याक असल्याबाबतचा पुरावा. तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेला उत्पनाचा दाखला. (मागील २०२३-२४ या आर्थिक वर्षाचा कुटूंबाचा)

(III) पदवी/पदव्युत्तर पदवी परिक्षा उतीर्ण झाल्याचे पुरावे. (दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर पदवी/पदविका यांच्या गुणपत्रांसह) (सनद/मार्कलिस्ट)

(IV) परदेशातील QS World Ranking २०० च्या आत असलेल्या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश मिळाल्याबाबतचे विनाअट (Unconditional) ऑफर लेटर.

(V) ज्या विद्यापीठामध्ये प्रवेश मिळाला आहे त्याचे सविस्तर माहिती पत्रकाची (Prospectus) प्रत.

(VI) आवश्यक ते करारनामे व हमीपत्रे

(VII) संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण होण्यासाठी वर्षनिहाय आवश्यक असणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक, ज्यामध्ये शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, इतर शुल्क पाठयपुस्तके, स्टेशनरी, भोजन व राहण्याचा खर्च, येण्याजाण्याचा विमान प्रवास याचा समावेश असावा.

(IX) विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत.

(X) पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी आणि पीएचडी अभ्यासक्रमासाठी अद्ययावत QS World Ranking ची जागतिक क्रमवारी.

(XI) वेळोवेळी समाज कल्याण आयुक्तालय,पुणे तसेच शासनाने ठरवून दिलेल्या बंधपत्र/विविध दाखले तसेच अन्य कागदपत्रे सादर करणे लाभार्थ्यावर बंधनकारक राहील.

सदर शिष्यवृत्तीसाठी खालील अभ्यासक्रमनिहाय निश्चित करण्यात आलेल्या जागा खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | विषय | पदव्युत्तर | डॉक्टरेट | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी व गणित | २२ | ६ | २८ |
| २ | औषधी व जैवशास्त्र | ११ | ६ | १७ |
| ३ | लिबरल आर्ट व ह्युमॅनिटीज | ११ | ६ | १७ |
| ४ | शेतकी | ६ | १ | ७ |
| ५ | कायदा व वाणिज्य | ५ | १ | ६ |
| | **एकूण** | **५५** | **२०** | **७५** |

(सदर जागामध्ये शासनाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार बदल करण्याचे अधिकार शासन राखीव ठेवीत आहे.)

दि.२०.६.२०२४ च्या अल्पसंख्यांक विकास विभागा शासन पुरक पत्रातील परिच्छेद क्र.७ (अ) मधील परदेशी शिष्यवृत्तीकरीता मंजूर करण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांची यादी देण्यात आलेली आहे.

**<u>खालील करारनामे, हमीपत्र बंधपत्रे</u>**:- हे निवडीनंतर सादर करणे आवश्यक आहे.

१. अभ्यासक्रम अर्धवट सोडल्यास शासनामार्फत करण्यात आलेल्या खर्चाची संपूर्ण रक्कम विद्यार्थी / पालक / जामीनदार यांच्याकडून एक रक्कमी वसूल करण्यास हरकत नसलेबाबत विद्यार्थी / पालक / जामीनदार यांची स्वाक्षरी असलेले रुपये ५००/- च्या बंधपत्रावर केलेले हमीपत्र.

२. अभ्यासक्रम पूर्ण झालेनंतर त्या ज्ञानाचा उपयोग भारतात येऊन करेल असे विद्यार्थ्यांचे हमीपत्र.

३. शिष्यवृत्तीसाठी मंजूर झालेला अभ्यासक्रम, मंजूर केलेली परदेशातील शिक्षण संस्था आणि मंजूर केलेला ठराविक कालावधी यामध्ये कोणताही बदल करणार नाही याबाबतचे विद्यार्थी / पालक / जामीनदाराचे हमीपत्र.

४. परदेशात गैरवर्तन करणे, परदेशामधील अभ्यासक्रम अर्धवट सोडणे, देश सोडून जाणे, अभ्यासक्रम, शैक्षणिक संस्था बदलणे, प्रगती असमाधानकारक असणे, विहीत कालावधी पेक्षा जास्त कालावधी करीता अनधिकृतपणे परदेशात वास्तव्य करणे याबाबत मिळालेले शिष्यवृत्तीचे सर्व लाभ व्याजासहीत परत करण्याबाबत विद्यार्थी / पालक / जामीनदाराचे हमीपत्र.

५. सदर शिष्यवृत्तीसाठी असलेल्या सर्व अटी व शर्ती, प्रचलित नियम व कायदे आणि त्यामध्ये वेळोवेळी होणारे बदल हे मान्य असलेबाबतचे विद्यार्थी / पालक / जामीनदार यांचे हमीपत्र.

**<u>अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख :-</u>**

विहीत नमुन्यातील परिपूर्ण भरलेला अर्ज कागदपत्रांसह सादर करण्याचा अंतिम दिनांक ०६/०९/२०२४ असेल. वेळ सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत.

**<u>इतर आवश्यक बाबी :-</u>**

१. अपूर्ण भरलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

२. अर्जासोबत आवश्यक असलेली स्वसाक्षांकित कागदपत्रे न जोडल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही. अर्जावर स्वसाक्षांकित फोटो नसलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

३. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

४. अल्पसंख्यांक विकास विभागाअंतर्गत येणाऱ्या प्रवर्गा व्यतिरिक्त इतर प्रवर्गाचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. त्यांनी संबंधीत कार्यालयाकडे परस्पर अर्ज करावेत.

५. QS World University Ranking २०० च्या आतील विद्यापीठाशिवाय इतर परदेशी शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

६. प्रचलित अटी व शर्तीनुसार अपात्र ठरल्यास त्यांना स्वतंत्र पत्रव्यवहार करुन कळविले जाणार नाही.

७. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांनी अर्जामध्ये दिलेल्या अधिकृत पत्यावर कळविले जाईल. जर विहीत कालावधीत त्यांनी आवश्यक ती कार्यवाही पूर्ण न केल्यास त्याची शिष्यवृत्ती रद्द करण्यात येईल.

८. परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्याचे अंतिम अधिकार शासनास असतील.

९. शासनाने सर्व विभागाच्या परदेश शिष्यवृत्ती योजनेच्या निकषामध्ये समानता आणण्या करीता सर्वकष धोरण ठरविले आहे. त्यामुळे नियोजन विभागाच्या शासन निर्णयानुसार तयार केलेल्या सर्वकष नियमावलीचे सर्व विभागांनी पालन करणे अपेक्षित असल्याने नियोजन विभागाने घेतलेला शासन निर्णय अंतिम असेल. त्यानुषंगाने नमूद करण्यात येते की, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (बांधकामे) कार्यासनामार्फत दि.३०.१०.२०२३ रोजी या संदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून त्या संदर्भात दि.९.११.२०२३ रोजी शासन शुध्दीपत्रक निर्गमित केलेले आहे. सदर योजनेअंतर्गत लाभ घेवू इच्छित असलेल्या विद्यार्थ्यास पुढील सत्राचा लाभ मिळण्यासाठी परदेशातील प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमामध्ये प्रत्येक वेळी उत्तीर्ण होणे बंधनकारक असून त्यासाठी शैक्षणीक संस्था/विद्यापीठाचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, प्रगती अहवाल प्रत्येक सत्रासाठी किंवा सहा महिन्यासाठी सादर करणे अनिवार्य आहे.

१०. शासन निर्णय दि.२५.७.२०२४ अन्वये अल्पसंख्यांक विभागाच्या परदेश शिष्यवृत्तीची विद्यार्थी संख्या २७ वरुन ७५ एवढी करण्यात मान्यता देण्यात आलेली आहे.

११. अल्पसंख्याक विकास विभाग शासन निर्णय दि.२३.११.२०२३, शासन पुरक पत्र दि.२०.६.२०२४, व शासन निर्णय क्र. सान्यावि-२०२४/प्र.क्र.७७/बांधकामे/दि.२५ जूलै, २०२४ मधील अटी व शर्ती लागू राहतील.

(ओम प्रकाश बकोरिया)
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

राज्यातील अल्पसंख्यांक समुदायातील विदयार्थ्यांकरीता परदेशात पदव्युत्तर पदवी व पी. एच. डी. अभ्यासक्रमासाठी परदेश शिष्यवृत्ती योजना सन २०२४-२५

| *विद्यार्थ्याने मुळ अर्जासोबत सादर करण्यासाठीची कागदपत्रांची चेक लिस्ट -: | | अर्ज क्रमांक |
|---|---|---|
| विदयार्थ्याचे संपुर्ण नाव- | | |
| अ.क्र. | कागदपत्रे/प्रमाणपत्रे/सहपत्रे | पान क्रमांक |
| १ | विहीत नमुन्यातील परिपुर्ण भरलेला मुळ अर्ज | |
| २ | अर्जदार अल्पसंख्यांक समुदायातील असलेबाबतचा पुरावा(छायांकित प्रत) | |
| ३ | जात पडताळणी दाखला (छायांकित प्रत) | |
| ४ | महाराष्ट्र राज्याचा रहिवासी दाखला (Domicile Certificate) (छायांकित प्रत) | |
| ५ | विद्यार्थ्याच्या वयासंबंधीचे प्रमाणपत्र (शाळा सोडल्याच्या दाखला/Domicile/SSC प्रमाणपत्र(सनद)) | |
| ६ | उत्पन्न दाखला व Form No.१६ व ITR (सन२०२३-२४) (छायांकित प्रत) फक्त *विवाहित महिला उमेदवारांचे बाबतीत पतीकडील वार्षिक उत्पन्नाचे कागदपत्रे | |
| ७ | इ. १० वी व १२ वी चे गुणपत्रक व प्रमाणपत्र (छायांकित प्रत) | |
| ८ | पदवी प्रमाणपत्र सर्व गुणपत्रक/Transcript सह (छायांकित प्रत) | |
| ९ | पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र सर्व गुणपत्रक/Transcript सह (छायांकित प्रत) | |
| १० | GRE (छायांकित प्रत) | |
| | TOEFL/IELTS(छायांकित प्रत) | |
| ११ | विनाअट प्रवेश पत्र (Unconditional Offer Letter) (मुळ प्रत) | |
| | USA मधील विद्यार्थ्यांसाठी F-१ (I-२० Certificate)उपलब्ध असल्यास(छायांकित प्रत) | |
| | संबंधित विद्यापीठाचे नाव असलेले QSWR List (छायांकित प्रत)जाहिरातीत नमूद केलेले | |
| १२ | परदेशातील विदयापीठातील अभ्यासक्रमाचे वार्षिक खर्चाचे अंदाजपत्रक (विद्यापीठाचे पत्र) | |
| १३ | आधारकार्ड (छायांकित प्रत) | |
| | पॅन कार्ड (छायांकित प्रत) | |
| १४ | भारतातील बॅंक खात्याचे पासबुक प्रथम पानाची छायांकित प्रत | |
| १५ | शिधा पत्रिका/ रेशन कार्ड (छायांकित प्रत) | |
| १६ | पासपोर्ट (छायांकित प्रत) | |
| १७ | वडील / पती हयात नसल्यास मृत्यू दाखला (छायांकित प्रत) | |
| १८ | दोन राजपत्रित अधिकाऱ्यांचे शिफारस पत्र (मुळ प्रत) | |
| १९ | आई वडील विभक्त असल्यास न्यायालयाचे संबंधित कागदपत्र (छायांकित प्रत) | |
| २० | विवाहित महिला अर्जदार घटस्फोटीत असल्यास न्यायालयाचे संबंधित कागदपत्र (प्रत छायांकित) | |
| २१ | Statement of purpose/निबंध (मुळ प्रत) | |
| २२ | रु.५००/- च्या स्टॅंप पेपरवर बंधपत्र (मुळ प्रत) (निवडीनंतर दिले तरी चालेल) | |
| २३ | रु.५००/- च्या स्टॅंप पेपरवर हमीपत्र (मुळ प्रत) (निवडीनंतर दिले तरी चालेल) | |
| २४ | विद्यापीठाच्या प्रॉस्पेक्टसच्या (Prospectus) सर्व पानांची प्रत | |
| २५ | | |

टीप : १. सर्व कागदपत्रे/प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती स्वत: प्रमाणित व साक्षांकित केलेल्या असाव्यात.

२. कागदपत्रे वरील क्रमानुसार लावावी.

३. कागदपत्रे/प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती अर्जासोबत सादर करु नयेत.

४. अर्जाच्या पहिल्या पानापासून ते शेवटच्या कागदपत्रांपर्यंत पान नंबर टाकतांना विषम संख्येमध्ये टाकावेत उदा. पान क्र.१,३,५,७,९,११....याप्रमाणे पान नंबर टाकावेत.

-अर्जाचा नमुना-

*अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांकरीता परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी परदेश शिष्यवृत्ती योजना-सन २०२४-२०२५ साठी अर्ज.*

| अर्जदाराचा<br>फोटो<br>(स्व: स्वाक्षरीत) |
|---|

प्रति,
मा. आयुक्त,
समाज कल्याण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, ३, चर्च पथ, पुणे- ४११ ००१.

विषय : *अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांकरीता परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी* परदेश शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज सादर करणेबाबत...(सन२०२४-२०२५)

महोदय,

अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांकरीता परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी परदेश शिष्यवृत्ती योजना या योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती मिळण्यासाठी मी माझी वैयक्तिक व कुटुंबाची माहिती या अर्जाव्दारे खालीलप्रमाणे सादर करीत असून मला सदर शिष्यवृत्ती मंजूर करण्यात यावी, अशी विनंती आहे.

अ) अर्जदाराची सर्वसाधारण माहिती:-

| | | |
|---|---|---|
| १. | विद्यार्थ्याचे संपूर्ण नांव :- | |
| अ. | ज्या अभ्यासक्रमासाठी दावा करु इच्छितो त्या अभ्यासक्रमाचा प्रकार व शाखा- (PG/PhD ) | अ) P G / Ph D:- ----------------------- |
| ब. | विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी व गणित/ औषधी व जैवशास्त्र/लिबरल आर्ट ह्युमॅनिटीज/ शेतीक/कायदा व वाणिज्य यापैकी लागु असेल ते नमुद करावे.* | शाखा :- |
| २.<br><br>३. | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता :-<br><br>भ्रमणध्वनी क्रमांक :- | |
| ४ | विद्यार्थ्याची धर्म व जात :- | |
| ५ | (अ) विद्यार्थ्याची जन्म तारीख :-<br><br>(ब) दि.१ मे, २०२४ रोजीचे वय:- | (अंकामध्ये ) ----------------------------------<br>(अक्षरी) ------------------------------------<br>------वर्षे |
| ६ | विद्यार्थ्याचा ई-मेल :- | |
| ७ | विद्यार्थ्याचा आधार (AADHAR) क्रमांक/नोंदणी क्रमांक:-( प्रत जोडावी) | |
| अ. | विद्यार्थ्याचा PAN क्रमांक:- | |
| ८ | महाराष्ट्र राज्याचा रहिवास आहे काय ? | |
| ९ | शैक्षणिक स्थिती/पात्रता माहिती-टिप-CGPA/GPA Conversion प्रमाणपत्राचे आधारे टक्केवारी | |

| | नमुद करणे व ते जोडलेले नसल्यास अपात्र ठरविण्यात येईल. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | परीक्षेचे नांव | उत्तीर्ण अभ्यासक्रमाचे नांव | परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | उत्तीर्ण झालेल्या शैक्षणिक संस्थेचे नांव व विद्यापीठाचे नांव | विद्यापीठाचे एकूण गुण | प्राप्त केलेले गुण | गुणांची टक्केवारी Grade/GPA etc असल्यास टक्केवारी दर्शविलेले प्रमाणपत्र जोडणे |
| | SSC | | | | | | |
| | HSC/ Diploma | | | | | | |
| | पदवी | | | | | | |
| | पदव्युत्तर /पदवी | | | | | | |
| | GRE/ GMAT | | | | | | |
| | TOEFL/ IELTS | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| १० | (अ) विद्यार्थ्याचा व्यवसाय<br>(ब) नोकरी करीत असल्यास नोकरीचा तपशील<br>(क) हुद्दा /पदनाम<br>(ड) अर्जदारास व्यवसाय/नोकरीमधून मिळणारे वार्षिक उत्पन्न (पुरावा जोडावा)<br>(इ) नोकरी करीत असल्यास कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र जोडले आहे काय? | |
| | (फ) विद्यार्थ्यांच्या कार्यालयाचा संपुर्ण पत्ता:- | |
| | (ह) विद्यार्थ्यांच्या कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक:- | |
| | (ग)विद्यार्थ्यांच्या कार्यालयाचा ई मेल- | |
| ११ | (अ) वैवाहिक स्थिती-(लागू असलेल्या ठिकाणी खुण करावी) | विवाहित/अविवाहित/विधवा/घटस्फोटीता /परित्यक्ता/पतीपासून विभक्त. |
| | (ब) विवाहीत असल्यास पती किंवा पत्नीचे व मुलांची नावे, वय, व उमेदवाराशी नाते | १.<br>२.<br>३. |
| | (क) विवाहित उमेदवारांच्या बाबतीत<br>(i) पती/पत्नीचे नावं व संपूर्ण रहिवास पत्ता<br>(ii) पती/पत्नीचे व्यवसाय/नोकरी करत असलेल्या ठिकाणाचे नावं, पदनांम व नोकरीच्या ठिकाणाचा पत्ता<br>(iii) पती/पत्नीचे आधार कार्ड व पॅन कार्ड क्र (प्रत सोबत जोडावी)<br>(iv) मुले शिकत असल्यास त्यांचे जन्मदाखला (प्रत | |

| | | |
|---|---|---|
| | जोडावी)<br>(v) त्यांना परदेशात सोबत घेवून जाणार का? | |
| | (ड) विधवा/घटस्फोटीता/परित्यक्ता/पतीपासून विभक्त असलेल्या महिला उमेदवार वडीलांकडे राहत असल्यास व त्यांचे उत्पन्न प्रमाणपत्र व सादर करीता असल्यास विधवा/ घटस्फोट/ परित्यक्ता/ पतीपासून विभक्त असल्याचे कायदेशीर कागदपत्रांचा तपशील (प्रत जोडावी) | |
| १२ | विद्यार्थ्याच्या आधार संलग्न भारतातील बँक खात्याची माहिती-<br>१.खातेदाराचे नाव-<br>२.बँकेचे नाव-<br>३.बँक शाखेचे नाव-<br>४.खाते क्र.-<br>५.IFSC क्र.-<br>६.MICR क्र.- | |
| १३ | पासपोर्ट क्रमांक-<br>जारी दिनांक-<br>वैधता दिनांक- | |
| १४ | अ. विद्यापीठाचे ऑफर लेटर क्र. व दिनांक- | |
| | ब. ऑफर लेटर विनाअट/अटीसहीत (नमूद करावे) | |
| | क. ऑफर लेटर अटीसह असल्यास कोणती अट आहे? ते नमूद करावे. | |
| | ड.ऑफर लेटरमधील अभ्यासक्रम | |
| | इ. ऑफर लेटर निर्गमित करणाऱ्या अधिकारी यांचे नाव व पदनाम. | नाव : -------------<br>पदनाम :- ------------- |
| १५ | यापुर्वी आपण राज्य किंवा केंद्र शासनाच्या परदेश शिष्यवृत्तीचा लाभ घेतला आहे काय ?<br>i)असल्यास वर्ष-<br>ii)परदेशातील शैक्षणिक संस्थेचे नाव व देश-<br>iii) अभ्यासक्रमाचे नाव-<br>iv) अभ्यासक्रमाचा कालावधी-<br>v) मिळालेली शिष्यवृत्तीची रक्कम- | होय/नाही------------- |
| (ब) अर्जदाराच्या पालकांची सर्वसाधारण माहिती:- | | |
| १ | (अ) विद्यार्थ्यांच्या पालकाचे संपूर्ण नांव:- | |
| | (ब) पालकांचा निवासस्थानाचा सध्याचा पूर्ण पत्ता:- | |
| | १. संपर्काचा दूरध्वनी क्रमांक:-<br>२. (एस.टी.डी. कोडसह / मोबाईल क्रमांक)<br>३. ई-मेल पत्ता:- | |
| २ | (अ) विद्यार्थ्याचा पालकांचा व्यवसाय<br>(ब) पालक नोकरी करीत असल्यास नोकरीचा तपशील<br>(क) हुद्दा /पदनाम | |

| | | |
|---|---|---|
| | (ड) पालकांस व्यवसाय/नोकरीमधून मिळणारे वार्षिक उत्पन्न (पुरावा जोडावा) | |
| | (ब) पालकांच्या कार्यालयाचा पत्ता:- | |
| | (क) कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक:- (एस.टी.डी कोडसह) | |
| | (ड) कार्यालयाचा ई -मेल पत्ता:- | |
| (क) कुटुंबाचे सर्व मार्गानी मिळुन एकत्रित वार्षिक उत्पन्नाबाबतची माहिती:- | | |
| १ | कुटुंबातील सर्व व्यक्तीचे सन २०२३-२४ मधील सर्व मार्गाने मिळणारे एकूण उत्पन्न:- (यामध्ये विद्यार्थी व कुटुंबात इतर व्यक्ती नोकरी अथवा व्यवसाय करीत असल्यास त्यांचे एकत्रित उत्पन्न उत्पन्नाच्या दाखल्यात नमूद करावे व त्याबाबतचे आयकर विवरणपत्र अर्जासोबत सादर करावे. वडील हयात नसल्यास तसा अर्जात उल्लेख करुन मृत्यूचा दाखला जोडणे आवश्यक आहे किंवा विभक्त असल्यास तसे अर्जात नमूद करुन त्याबाबतचे न्यायालयाचे कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.) | १. एकत्रित वार्षिक उत्पन्न रुपये --------------- जोडलेले आहे / नाही<br><br>२. आयकर विवरणपत्र -------------- जोडलेले आहे / नाही.<br><br>३. वडील हयात नसल्यास मृत्युचा दाखला जोडलेला आहे / नाही.<br><br>४. आई वडील विभक्त असल्यास न्यायालयाचे संबंधित कागदपत्र जोडलेले आहे / नाही. |
| (ड) विद्यार्थ्याच्या कुटुंबाची माहिती :- विदयार्थ्याच्या माहितीसह (सोबत राशनकार्ड आवश्यक) | | |
| १ | विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचा तपशील:- | |

| अ. क्र. | संपूर्ण नांव | वय | विद्यार्थ्याशी असलेले नाते | व्यवसाय | एकूण वार्षिक उत्पन्न | यापूर्वी राज्य/केंद्र शासनाच्या परदेश शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला आहे का? |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | स्वत: | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |
| ६ | | | | | | |
| ७ | | | | | | |
| ८ | | | | | | |
| ९ | | | | | | |
| १० | | | | | | |
| | | | कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न- | | | |

| | | |
|---|---|---|
| २ | विद्यार्थी वगळून कुटुंबातील इतर व्यक्तीने परदेश शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेतला असल्यास:- | |

| | | |
|---|---|---|
| | i. प्रवेशाचे वर्ष- | |
| | ii .प्रवेश घेतलेले विद्यापीठ व देशाचे नाव- | |
| | iii .महाराष्ट्र शासन-केंद्र शासन किंवा इतर राज्य/ | |

(इ) परदेशातील शैक्षणिक संस्थेतील/विद्यापीठातील प्रवेशाबाबत माहिती:-

| | | |
|---|---|---|
| १ | (अ) विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या परदेशातील विद्यापीठाचे नांव:- | |
| | (ब) QS World University Ranking सन मे,२०२४ चे नमूद करावे | |
| | (क) विद्यार्थ्यांने प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाचे नांव:- | |
| | (ड)अभ्यासक्रमाचे स्वरुप (पुर्णवेळ /अर्धवेळ/ online/ Executive) यापैकी कोणते ते नमूद करावे. | |
| | (इ) अभ्यासक्रमाचा किमान कालावधी:- | |
| | (फ) विद्यापीठ प्रवेश दिनांक:- | |
| | (ग) परदेशातील विद्यापीठाच्या पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता:- | |
| | (घ) परदेशातील विद्यापीठाचा दूरध्वनी क्रमांक (ISD कोडसह) :- | |
| | (ह) परदेशातील विद्यापीठाचा ई-मेल:- | |

(फ) ऑफर लेटरनुसार परदेश शिक्षणासाठीचा खर्च:-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांने परदेशातील अभ्यासक्रमासाठी भरलेल्या / भरावयाच्या फी (शुल्क) चा तपशील | एका वर्षाचा खर्च | | संपूर्ण अभ्यासाक्रमाचा खर्च | |
| | | विदेशी चलनात | भारतीय चलनात(₹) | विदेशी चलनात | भारतीय चलनात (₹) |
| | शिक्षण फी-<br>परीक्षा फी-<br>नोंदणी फी-<br>जेवणाचा / राहण्याचा खर्च-<br>विमा खर्च-<br>व्हिसा खर्च -<br>अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेला इतर खर्च<br>(तपशील जोडावा) | | | | |
| | एकूण सर्व खर्च- | | ₹ | | ₹ |
| २ | विद्यार्थ्याला खालीलपैकी मंजूर झालेल्या/प्राप्त होणाऱ्या बाबींचा तपशील-<br>१. विद्यापीठातील इतर शिष्यवृत्ती<br>२. Fellowship<br>३. Graduate Teacher Assistance ship<br>४. इतर मानधन<br>५. Campus job/library | | | | |

आम्ही असे जाहीर करतो की, वर सादर केलेली सर्व माहिती संपूर्णत: सत्य आहे ही माहिती खोटी आढळल्यास अर्जदार सदर शिष्यवृत्तीस अपात्र ठरेल. तव्दतच या योजनेशी संबंधीत शासन निर्णयातील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहील.शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परि पत्रके, अटी व शर्ती मला बंधनकारक असतील. मी अल्पसंख्याक समुदायातील

विद्यार्थ्याकरीता परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी परदेश शिष्यवृत्ती योजना या योजनेतील शासन निर्णय व नियमावली तसेच सर्वंकष धोरणातील शासन निर्णय वाचले असून त्यामध्ये नमूद सर्व भाग, प्रतिज्ञापत्र, ना हरकत पत्र, Surety Bond व इतर आवश्यक बंधपत्रे व हमीपत्रे सादर करण्यास हरकत नाही व ती सर्व मी सोबत सादर करीत आहे. शासन निर्णय दि. २३.११.२०२३ मधील "कर्तव्यात कसुर" हा परिच्छेद मी वाचून समजून घेतला आहे व तो मला मान्य असून मी सर्व बाबींचे पालन करीन व भारत देशाची कोणत्याही प्रकारची नामुष्की परदेशात होईल असे गैरवर्तन वा गैरकृत्य मी करणार नाही याबाबत याव्दारे मी हमी देत आहे. माझी निवड झाल्यास मी तात्काळ परदेशातील भारतीय दुतावासाशी संपर्क करुन तेथे माझी नोंदणी करुन ती आपणास तसेच अल्पसंख्याक विकास विभागास त्वरीत सादर करेन.

तसेच नजिकच्या काळात योजने अंतर्गत पालकांच्या कुटूंबाच्या उत्पन्न मर्यादेत तसेच जागांमध्ये बदल झाल्यास त्यानुसार जाहिरातीमध्ये आवश्यक ते बदल करण्याचे, सुधारणा करण्याचे व फेरअर्ज मागविण्याचे अधिकार शासन राखून ठेवीत आहे. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता पात्र विद्यार्थ्यांकडून परदेश शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत याची मला जाणीव असून सदरहु बाब मला मान्य आहे.

ठिकाण: पालकाची सही : विद्यार्थ्यांची सही :

दिनांक : / /२०२४ पालकाचे नांव : विद्यार्थ्यांचे नांव :

(टिप- निवडीनंतर सादर करावयाचे आहे.)

(रु.५००/- च्या स्टॅम पेपर वर करणे)

अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत अल्पसंख्यांक समुदायातील विद्यार्थ्यांकरीता परदेशात पदव्युत्तर पदवी व पी.एच.डी अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती योजनेसाठीचे (सन २०२४-२५)

-हमी पत्र-

१. मी ------------------------------------------------------------ राहणार ------------------------------------------------------------ ----------------------------------येथे राहत असून माझी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत अल्पसंख्यांक समुदायातील विद्यार्थ्यांकरीता परदेशात पदव्युत्तर पदवी व पी.एच.डी अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती योजना या योजने अंतर्गत परदेशातील (देशाचे नाव)-------------------------- येथे (विद्यापीठाचे नाव) ---------------------------------------- या विद्यापीठात (कालावधी)----- ------ वर्षाच्या (अभ्यासक्रमाचे नाव)------------------------------------------ या अभ्यासक्रमासाठी सन---------- या वर्षाकरिता परदेश शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे. त्या अनुषंगाने मी आयुक्त समाज कल्याण पुणे यांना खालीलप्रमाणे हमी देत आहे.

२. मी सद्यस्थितीत ------------------------------------------------ येथे नोकरीस असून सदर कार्यालयातील प्रशासकीय बाबी उदा. रजा, वेतन आणि इतर सेवेच्या बाबी या स्वत: प्रत्यक्षपणे निराकरीत करेल यासाठी कोणत्याही प्रकारची सवलत शासनाकडून घेणार नाही. (नोकरी करणाऱ्यांसाठी लागू)

३. अर्जात नमुद केलेला अभ्यासक्रम विहीत कालावधीत पुर्ण करणे माझ्यावर बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रम पुर्ण करण्यासाठी **वाढीव कालावधीची मागणी करणार नाही.**

४. मला शासनाने मंजूर केलेल्या परदेशातील विद्यापीठ व शैक्षणिक अभ्यासक्रमात मी परस्पर बदल करणार नाही.

५. अर्जासोबत सादर केलेले कागदपत्रे / प्रमाणपत्रे हे खोटे व बनावट असल्याचे आढळून आल्यास शिष्यवृत्ती पोटी मिळालेली सर्व रक्कम व्याजासह परत करण्याची हमी देत आहे.

६. कोणत्याही कारणास्तव अभ्यासक्रम अर्धवट सोडल्यास शासनातर्फे मला अदा करण्यात आलेली शिष्यवृत्तीची सर्व रक्कम व्याजासह कुटूंबाच्या मालकीच्या / जामिनदार यांच्या स्थावर मालमत्तेमधून एक रकमी भरपाई करण्याची अथवा वसुल करण्याची हमी देत आहे.

७. परदेशामध्ये शिक्षण घेत असतांना काही कारणास्तव राज्य शासनाच्या पुर्व परवानगीने परदेशातून भारतात काही कालावधीसाठी वास्तव्य केले असेल तर सदर कालावधीची शिष्यवृत्तीची रक्कम मला अनुज्ञेय होणार नाही.

८. परदेश शिष्यवृत्ती अंतर्गत परदेशात शिक्षण घेत असतांना जास्तीची रक्कम शासनातर्फे मला अदा झाली असल्याचे निदर्शनास आल्यास त्याची परतफेड करेन अथवा न केल्यास ती वसुल करणेबाबत प्रचलित कायदे व नियमानुसार कार्यवाहीस मी पात्र असेन.

९. मला शिक्षण फी व इतर फी, निर्वाह भत्ता व आकस्मिक खर्च यासाठी शासनाने निर्धारित केलेल्या दरापेक्षा कोणताही जास्तीचा खर्च अनुज्ञेय होणार नाही. निधारित दरापेक्षा होणारा जास्तीचा खर्च मी स्वत: अदा करेन.

१०. परदेशातील प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमामध्ये प्रत्येक वेळी उत्तीर्ण होणे माझ्यावर बंधनकारक असून तसे शैक्षणिक संस्था/विद्यापीठाचे प्रमाणपत्र गुणपत्रिका, प्रगती अहवाल प्रत्येक सत्रासाठी किंवा सहा महिन्यांसाठी आयुक्तालयास सादर करेन.

११. कोणतेही कारण अथवा सबबी सांगून अभ्यासक्रम पूर्ण न करणे, विहीत प्रयोजनासाठी खर्च न करणे, खर्चात काटकसर न करणे, विहीत लाभ मर्यादेपेक्षा जास्तीची मागणी परदेशात जावून करणे, कोणत्याही प्रकारचा दबाव आणणे किंवा धमकी देणे, परदेश शिष्यवृत्ती नियमावलींतील तरतूदींचे उल्लंघन करणे, परदेशातील नियम / अटी /तरतूदींचे उल्लंघन करणे, वाममार्गास लागणे, परदेशातील शैक्षणीक कालावधीत कोणत्याही प्रकारचे गैरकृत्य करणे व त्यासाठी दंड शिक्षा होणे, भारतीय राष्ट्रीयत्त्वास हानी पोहचवणे, भारताची बदनामी करणे या बाबी कर्तव्यातील कसूर समजण्यात येतील. कर्तव्यात कसूर केल्यास मला अपात्र ठरवून माझ्या परदेशी शिक्षणासाठी शासनाने दिलेले सर्व लाभ माझ्याकडून व्याजासह वसूल केले जातील.

१२. परदेशातील अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर मी भारतात येवून माझ्या ज्ञानाचा उपयोग देशासाठी करेन.

१३. उपरोक्त नमूद केलेला सर्व मजकूर मला मान्य असून तो मी वाचून समजून घेऊन आज दिनांक- / /२०२४ रोजी----------- मुक्कामी सही केली असे, वरील बाबींचे माझ्याकडून उल्लंघन झाल्यास मी भारतीय दंड संविधान कलम १९३ (२), १९९, २०० व ४०६ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

स्थळ :

दिनांक : / /२०२४.

| सही | | सही | | सही | |
|---|---|---|---|---|---|
| (विद्यार्थी) | (फोटो) | (पालक) | (फोटो) | (जामीनदार) | (फोटो) |
| संपूर्ण नांव व पत्ता<br>दूरध्वनी क्र. / मो.क्रं. | | संपूर्ण नांव व पत्ता<br>दूरध्वनी क्र. / मो.क्रं. | | संपूर्ण नांव व पत्ता<br>दूरध्वनी क्र. / मो.क्रं. | |

# QS World University Rankings 2024

Rank University Overall Score

1

**Massachusetts Institute of Technology (MIT)**
Cambridge, United States 100

2

**University of Cambridge**
Cambridge, United Kingdom99.2

3

**University of Oxford**
Oxford, United Kingdom98.9

4

**Harvard University**
Cambridge, United States98.3

5

Stanford University

**Stanford University**
Stanford, United States98.1

6

IMPERIAL

**Imperial College London**
London, United Kingdom97.8

7

ETH Zurich
Zürich, Switzerland93.3

8

NUS

National University of Singapore (NUS)
Singapore, Singapore92.7

9

UCL
London, United Kingdom92.4

10

University of California, Berkeley (UCB)
Berkeley, United States90.4

11

University of Chicago
Chicago, United States90.3

12

University of Pennsylvania
Philadelphia, United States89.4

13

Cornell University
Ithaca, United States89.3

14

**The University of Melbourne**
Parkville, Australia87.9

15

Caltech

**California Institute of Technology (Caltech)**
Pasadena, United States87.8

16

**Yale University**
New Haven, United States87.7

=17

**Peking University**
Beijing, China (Mainland)87

=17

**Princeton University**
Princeton, United States87

=19

**The University of New South Wales (UNSW Sydney)**
Sydney, Australia86.7

=19

**The University of Sydney**
Sydney, Australia86.7

21

**University of Toronto**

Toronto, Canada86.3

22

**The University of Edinburgh**

Edinburgh, United Kingdom86.1

23

**Columbia University**

New York City, United States85.9

24

**Université PSL**

Paris, France85.8

25

**Tsinghua University**

Beijing, China (Mainland)84.9

=26

**Nanyang Technological University, Singapore (NTU Singapore)**

Singapore, Singapore84.5

=26

**The University of Hong Kong**

Hong Kong, Hong Kong SAR84.5

28

**Johns Hopkins University**
Baltimore, United States84.5

28

**The University of Tokyo**
Tokyo, Japan84.3

29

**University of California, Los Angeles (UCLA)**
Los Angeles, United States83.8

30

**McGill University**
Montreal, Canada83.7

32

**The University of Manchester**
Manchester, United Kingdom82.2

33

**University of Michigan-Ann Arbor**
Ann Arbor, United States81.7

=34

**Australian National University (ANU)**
Canberra, Australia81.5

=34

University of British Columbia

Vancouver, Canada81.5

36

EPFL – École polytechnique fédérale de Lausanne

Lausanne, Switzerland80.4

37

Technical University of Munich

Munich, Germany80

=38

Institut Polytechnique de Paris

Palaiseau Cedex, France79.5

=38

New York University (NYU)

New York City, United States79.5

40

King's College London

London, United Kingdom79.3

41

Seoul National University

Seoul, South Korea78.5

42

**Monash University**
Melbourne, Australia78.2

43

**The University of Queensland**
Brisbane City, Australia78.1

=44

**Zhejiang University**
Hangzhou, China (Mainland)77.8

45

**The London School of Economics and Political Science (LSE)**
London, United Kingdom76.9

46

**Kyoto University**
Kyoto, Japan76.3

=47

**Delft University of Technology**
Delft, Netherlands76.2

=47

Northwestern University

**Northwestern University**
Evanston, United States76.2

=47

CUHK

**The Chinese University of Hong Kong (CUHK)**
Hong Kong, Hong Kong SAR76.2

50

**Fudan University**
Shanghai, China (Mainland)74.4

51

**Shanghai Jiao Tong University**
Shanghai, China (Mainland)74.3

52

**Carnegie Mellon University**
Pittsburgh, United States73.7

53

**University of Amsterdam**
Amsterdam, Netherlands73.4

54

**Ludwig-Maximilians-Universität München**
Munich, Germany72.5

55

**University of Bristol**
Bristol, United Kingdom **5+**QS Stars72.4

56

KAIST

**KAIST - Korea Advanced Institute of Science & Technology**
Daejeon, South Korea72.2

57

Duke

**Duke University**
Durham, United States72

58

TEXAS

**University of Texas at Austin**
Austin, United States71.8

59

**Sorbonne University**
Paris, France71.7

60

**The Hong Kong University of Science and Technology**
Hong Kong, Hong Kong SAR71.1

61

**KU Leuven**
Leuven, Belgium70.1

62

UCSanDiego

**University of California, San Diego (UCSD)**
San Diego, United States70

63

University of Washington

Seattle, United States69.2

64

University of Illinois at Urbana-Champaign

Champaign, United States69.1

=65

The Hong Kong Polytechnic University

Hong Kong SAR, Hong Kong SAR68.7

=65

Universiti Malaya (UM)

Kuala Lumpur, Malaysia68.7

67

The University of Warwick

Coventry, United Kingdom68.6

68

The University of Auckland

Auckland, New Zealand68

69

National Taiwan University (NTU)

Taipei, Taiwan67.9

70

City University of Hong Kong
Hong Kong SAR67.7

71

Université Paris-Saclay
Gif-sur-Yvette,, France67.6

72

The University of Western Australia
Perth, Australia
66.9

=73

Brown University
Providence, United States66.4

=73

KTH Royal Institute of Technology
Stockholm, Sweden66.4

75

University of Leeds
Leeds, United Kingdom65.5

=76

University of Glasgow
Glasgow, United Kingdom
5+QS Stars65.2

=76

Yonsei University
Seoul, South Korea65.2

78

Durham University
Durham, United Kingdom65.1

79

Korea University
Seoul, South Korea64.7

80

Osaka University
Osaka City, Japan63.9

=81

Trinity College Dublin, The University of Dublin
Dublin, Ireland63.5

=81

University of Southampton
Southampton, United Kingdom63.5

83

Pennsylvania State University
University Park, United States
5QS Stars63.1

84

UNIVERSITY OF BIRMINGHAM
University of Birmingham
Birmingham, United Kingdom63

=85

LUND UNIVERSITY
Lund University
Lund, Sweden62.8

=85

USP
Universidade de São Paulo
São Paulo, Brazil62.8

=87

Lomonosov Moscow State University
Moscow, Russia62.2

=87

Universität Heidelberg
Heidelberg, Germany62.2

89

**The University of Adelaide**
Adelaide, Australia62

90

**University of Technology Sydney**
Haymarket, Australia
**5+**QS Stars61.8

=91

**Tokyo Institute of Technology (Tokyo Tech)**
Tokyo, Japan61.6

=91

**University of Zurich**
Zürich, Switzerland61.6

=93

**Boston University**
Boston, United States61.4

=93

**Universidad Nacional Autónoma de México (UNAM)**
Mexico City, Mexico61.4

=95

**Universidad de Buenos Aires (UBA)** Buenos Aires, Argentina61

=95

**University of St Andrews**
St. Andrews, United Kingdom61

97

**Georgia Institute of Technology**
Atlanta, United States60.9

98

**Freie Universitaet Berlin**
Berlin, Germany60.8

99

**Purdue University**
West Lafayette, United States60.7

=100

**Pohang University of Science And Technology (POSTECH)**
Pohang , South Korea60.4

=100

**University of Nottingham**
Nottingham, United Kingdom60.4

102

**University of Wisconsin-Madison**
Madison, United States60

103

**Pontificia Universidad Católica de Chile (UC)**
Santiago, Chile59.9

104

**The University of Sheffield**
Sheffield, United Kingdom59.7

105

**Uppsala University**
Uppsala, Sweden59.4

106

**RWTH Aachen University**
Aachen, Germany59.3

=107

**University of Copenhagen**
Copenhagen, Denmark58.8

=107

**Utrecht University**
Utrecht, Netherlands58.8

109

**Aalto University**
Espoo, Finland58.7

110

Newcastle University

Newcastle upon Tyne, United Kingdom
5+QS Stars58.6

111

University of Alberta

Edmonton,, Canada58.3

112

University of Waterloo

Waterloo, Canada58.1

113

Tohoku University

Sendai City, Japan58

114

Western University

London, Canada
5+QS Stars57.4

115

University of Helsinki

Helsinki, Finland57.2

116

**University of Southern California**
Los Angeles, United States57.1

117

**University of Oslo**
Oslo, Norway56.9

118

**Stockholm University**
Stockholm, Sweden56.8

=118

**University of California, Davis**
Davis, United States56.7

119

**KIT, Karlsruhe Institute of Technology**
Karlsruhe, Germany56.4

120

**Humboldt-Universität zu Berlin**
Berlin, Germany56.3

121

**Technical University of Denmark**
Kongens Lyngby, Denmark56.2

122

Lancaster University

Lancaster,, United Kingdom

**5**QS Stars55.7

123

Politecnico di Milano

Milan, Italy55.2

=124

TU/e

Eindhoven University of Technology

Eindhoven, Netherlands55

=124

University of Basel

Basel, Switzerland55

=126

Leiden University

Leiden, Netherlands54.8

=126

University of Bern

Bern, Switzerland54.8

128

University of Geneva
Geneva, Switzerland54.2

129

Chalmers University of Technology
Gothenburg, Sweden54

=130

Macquarie University (Sydney, Australia)
Sydney, Australia53.7

=130

University of Vienna
Vienna, Austria53.7

=132

University of North Carolina at Chapel Hill
Chapel Hill, United States53.2

=134

Sapienza University of Rome
Rome, Italy52.9

=134

Texas A&M University
College Station, United States52.9

136

Michigan State University
East Lansing, United States52.7

=137

Universiti Sains Malaysia (USM)
Gelugor, Malaysia52.6

=137

University of Science and Technology of China
Hefei, China (Mainland)52.6

139

University of Groningen
Groningen, Netherlands52.5

140

RMIT University
Melbourne, Australia
5+QS Stars52.4

=141

Nanjing University
Nanjing, China (Mainland)52.1

=141

Université de Montréal Montreal, Canada52.1

=143

**Aarhus University**
Aarhus, Denmark52

=143

**King Abdulaziz University (KAU)**
Jeddah, Saudi Arabia52

=145

**Queen Mary University of London**
London, United Kingdom51.9

=145

**Rice University**
Houston, United States51.9

=145

**Sungkyunkwan University (SKKU)**
Suwon, South Korea51.9

148

**University of Bath**
Bath, United Kingdom51.8

=149

**Indian Institute of Technology Bombay (IITB)**
Mumbai, India51.7

=149

Universitat Autònoma de Barcelona
Barcelona, Spain51.7

=151

The Ohio State University
Columbus, United States51.3

=151

Wageningen University & Research
Wageningen, Netherlands51.3

153

University of Exeter
Exeter, United Kingdom50.9

=154

Alma Mater Studiorum - Università di Bologna
Bologna, Italy50.5

=154

Cardiff University
Cardiff, United Kingdom50.5

=154

Technische Universität Berlin (TU Berlin) Berlin, Germany50.5

=154

**Washington University in St. Louis**

St. Louis, United States50.5

158

**Universiti Putra Malaysia (UPM)**

Seri Kembangan, Malaysia50.4

=159

**Ghent University**

Ghent, Belgium50.2

=159

**Universidad de Chile**

Santiago, Chile50.2

=159

**Universiti Kebangsaan Malaysia (UKM)**

Bangi, Malaysia

**5**QS Stars50.2

162

**University of Wollongong**

Wollongong, Australia

**5+**QS Stars50.1

163

University of California, Santa Barbara (UCSB)
Santa Barbara, United States50

=164

Hanyang University
Seoul, South Korea49.7

=164

Kyushu University
Fukuoka City, Japan49.7

=164

Universitat de Barcelona
Barcelona, Spain49.7
=166

Emory University
Atlanta, United States49.6

167

University of York
York, United Kingdom49.4

168

University of Florida
Gainesville, United States49.1

=169

**University of Maryland, College Park**
College Park, United States48.9

=169

**University of Reading**
Reading, United Kingdom48.9

=171

**Complutense University of Madrid**
Madrid, Spain48.8

=171

**University College Dublin**
Dublin, Ireland48.8

=173

**Qatar University**
Doha, Qatar48.7

=173

**The University of Newcastle, Australia (UON)**
Callaghan, Australia48.7

=173

**University of Cape Town**
Cape Town, South Africa48.7

=176

**Erasmus University Rotterdam**
Rotterdam, Netherlands48.5

=176

**Nagoya University**
Nagoya, Japan48.5

=176

**University of Liverpool**
Liverpool, United Kingdom
48.5

179

**Arizona State University**
Tempe, United States48.1

=180

**KFUPM**
Dhahran, Saudi Arabia48

=180

**Université catholique de Louvain (UCLouvain)**
Louvain-la-Neuve, Belgium48

182

**University of Calgary** Calgary, Canada47.9

183

**Curtin University**
Perth, Australia
5+QS Stars47.8

=184

**Technische Universität Wien**
Vienna, Austria47.6

=184

**Tecnológico de Monterrey**
Monterrey, Mexico
5+QS Stars47.6

=184

**École Normale Supérieure de Lyon**
Lyon, France47.6

187

**University of Gothenburg**
Gothenburg, Sweden47.3

188

**Universiti Teknologi Malaysia**
Skudai, Malaysia
5QS Stars46.9

=189

McMaster University
Hamilton, Canada46.8

=189

Queensland University of Technology (QUT)
Brisbane, Australia46.8

=189

Universite libre de Bruxelles
Brussels, Belgium46.8

=192

Albert-Ludwigs-Universitaet Freiburg
Freiburg im Breisgau, Germany46.7

=192

Ecole des Ponts ParisTech
Paris, France46.7

194

Wuhan University
Wuhan, China (Mainland) 46.6

195

University of Minnesota Twin Cities Minneapolis, United States46.4

196

**Hokkaido University**
Sapporo, Japan46.2

197

**Indian Institute of Technology Delhi (IITD)**
New Delhi, India46.1

198

**Universidad de los Andes**
Bogotá, Colombia46

=199

**Universidad Autónoma de Madrid**
Madrid, Spain45.9

=199

**Waseda University**
Tokyo, Japan45.9

राज्यातील अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांकरिता परदेशात पदव्युत्तर पदवी व पी.एच्.डी. अभ्यासक्रमासाठी शिष्यवृती योजना.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : अविवि २०१९/ प्र.क.२११/ का-६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई -४०००३२
दिनांक : २३ नोव्हेंबर, २०२३

**प्रस्तावना :-**

अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशातील नामांकीत विद्यापीठामध्ये प्रवेश घेता येत नाही. विद्यार्थ्यांची गुणवत्ता असूनही, त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणापासून त्यांना वंचित रहावे लागते. अल्पसंख्याक समुदायातील मुलांना परदेशात शिक्षणाची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा म्हणून शासनाकडून अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांना "परदेश शिष्यवृत्ती योजना" लागू करण्यात येईल व त्यासाठी रूपये १२० कोटीचा निधी उपलब्ध केला जाईल. अशी मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांनी सन २०२० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात घोषणा केली. व त्यास अनुसरुन अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांना "परदेश शिष्यवृत्ती योजना" लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

क्यूएस वर्ल्ड रॅन्कींग (Qs World Ranking) मधील २००च्या आत असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये पदव्युत्तर पदवी आणि पी.एच्.डी अभ्यासक्रमासाठी बीनशर्त (Unconditional) प्रवेशास पात्र ठरलेल्या महाराष्ट्रातील अल्पसंख्याक समूदायातील २७ विद्यार्थांना प्रतीवर्षी परदेश शिष्यवृत्ती मंजूर करण्याचा शासनाने निर्णय घेतला असून तिचे स्वरुप खालील प्रमाणे राहील.

**१) विद्यार्थ्यांची पात्रता -**

(१) विद्यार्थी हा केंद्र अथवा महाराष्ट्र शासनाने धार्मिक अल्पसंख्याक म्हणून घोषित केलेल्या समुदायातील व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

(२) विदयार्थ्यांने परदेशातील क्युएस् अद्ययावत वर्ल्ड रॅकींगमध्ये २०० च्या आत असलेल्या शैक्षणिक संस्थेत खात्रीशीर व बिनशर्त प्रवेश मिळविलेला असावा.

(३) ज्या विद्यार्थ्यांने परदेशी शैक्षणिक संस्थाकडून Unconditional offer letter मिळालेले असेल, त्यांनाच ही शिष्यवृत्ती अनुज्ञेय राहील. यासाठी Conditional offer letter गृहीत धरेल जाणार नाही.

(४) विद्यार्थ्यांने या योजनेखालील शिष्यवृत्तीसाठी अर्ज करताना, त्याने यापूर्वी महाराष्ट्र शासनाची वा कोणत्याही अन्य विद्यापीठाची वा इतर कोणत्याही राज्य शासनाची वा केंद्र शासनाची वा अन्य संस्थांकडून परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती घेतलेली नसावी.

(५) परदेशातील विद्यापीठ/शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेणारा विद्यार्थी हा पूर्ण वेळ विद्यार्थी म्हणून प्रवेशित असावा. तसेच अभ्यासक्रमाचा कालावधी कमीत कमी दोन वर्षांचा असावा.

(६) एक्झीक्युटीव्ह पदव्युत्तर पदवी किंवा एक्झीक्युटीव्ह पदव्युत्तर पदविका व अर्धवेळ अभ्यासक्रमांस प्रवेशीत विद्यार्थी या योजनेसाठी पात्र असणार नाहीत.

**(२) शैक्षणिक अर्हता**

पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी पदवी परीक्षेत व पी.एच.डी अभ्यासक्रमासाठी पदव्युत्तर पदवी परीक्षेत **किमान ५५% गुण** असणे आवश्यक आहे.

**(३) वयोमर्यादा:-**

पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी लाभार्थ्यांची कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे आणि पी.एच.डी अभ्यासक्रमासाठी लाभार्थ्यांची कमाल वयोमर्यादा ४० वर्ष असावी.

**(४) उत्पन्न मर्यादा:-**

विद्यार्थ्यांच्या पालकांचे/कुटुंबाचे व विद्यार्थी नोकरी करीत असल्यास त्याच्या स्वत:च्या उत्पन्नासह सर्व स्त्रोतातून मिळणारे उत्पन्न रु. ८.०० लाखापेक्षा जास्त नसावे. **विद्यार्थी अविवाहीत असल्यास कुटुंबामध्ये त्याच्या पालकांचा समावेश असेल. विद्यार्थी विवाहीत असल्यास कुटुंबामध्ये पती/पत्नीचा समावेश असेल.**

**(५) एकाच कुटुंबातील कमाल पात्रता धारक:-**

एका कुटुंबातील एका मुलास फक्त एकदाच या योजनेचा लाभ घेता येईल.

**६) अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे प्रमाण:-**

अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणाकरीता शिष्यवृत्ती प्रदान करण्याकरीता त्यांची लोकसंख्येच्या प्रमाणात विद्यार्थीसंख्येचे वाटप खालीलप्रमाणे आहे. -:

(सन २०११ च्या जनगणनेनुसार)

| अ.क्र. | अल्पसंख्याक समुदायाचे नाव | लोकसंख्या | अल्पसंख्याक समुदायातील एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात टक्केवारी | शिष्यवृत्ती देय संख्या (२७ पैकी) |
|---|---|---|---|---|
| १. | मुस्लीम | १२,९७,११५२ | ५८.१५ | १५ |
| २. | बौद्ध | ६५,३१,२०० | २९.२७ | ७ |
| ३. | ख्रिश्चन | १०,८००७३ | ४.८४ | १ |
| ४. | जैन | १४००३४९ | ६.२७ | १ |
| ५. | पारशी | ५७,००० | ०.२५ | १ |
| ६. | ज्यू | २४६६ | ०.००२ | १ |
| ७. | शीख | २२३२४७ | १.० | १ |
| | एकूण | २,२२,६५,४८७ | - | २७ |

मात्र एखाद्या समुदायाचे पात्र विद्यार्थी कमी झाल्यास आंतरबदलाने अन्य समुदायाच्या विद्यार्थ्यांना त्या रिक्त जागांचा लाभ देय राहील.

**७) योजनेखाली समाविष्ट असलेले अभ्यासक्रम**

सदर शिष्यवृत्तीसाठी खालील अभ्यासक्रम निश्चित करण्यात येत आहेत :-

एकूण शिष्यवृत्ती संख्या २७

| अ.क्र. | विषय | पदव्युत्तर | डॉक्टरेट | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी व गणित | ०८ | ०२ | १० |
| २ | औषधी व जैवशास्त्र | ०४ | ०२ | ०६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | लिबरल आर्ट व ह्युमॅनिटीज | ०४ | ०२ | ०६ |
| ४ | शेतकी | ०२ | ०१ | ०३ |
| ५ | कायदा व वाणिज्य | ०२ | ---- | ०२ |
| | एकूण | २० | ७ | २७ |

निवड वर्षामध्ये पदव्युत्तर पदवी / डॉक्टरेट (पीएचडी) अभ्यासक्रमांसाठी जर एखाद्या शाखेमध्ये उमेदवार उपलब्ध झाले नाहीत, तर दुसऱ्या शाखेतील पदव्युत्तर पदवी / डॉक्टरेट (पी.एच.डी) अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये आंतरपरिवर्तनाने बदल करण्याचे अधिकार शासनास असतील. उपरोक्त आंतरपरिवर्तन हे उभे अथवा आडवे (Horizontal or Vertical) असे कोणत्याही स्वरुपात राहील.

**(८) अभ्यासक्रमाचा कालावधी :-**

(१) पी.एच.डी साठी ४ वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी या पेक्षा कमी असेल तो. तथापि कोणत्याही परिस्थितीत दोन वर्षा पेक्षा कमी नसावा.

(२) पदव्युत्तर पदवीसाठी ३ वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी यापेक्षा कमी असेल तो. तथापि कोणत्याही परिस्थितीत २ वर्षापेक्षा कमी नसावा.

**९) विद्यार्थ्यांना मिळणारे लाभ:-**

परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांस / उमेदवारास खालील लाभ देण्यात येतील.

(१) परदेशातील शैक्षणिक संस्थेने ऑफर लेटरमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक कालावधीसाठी लागू केलेली संपूर्ण शिक्षण फी (Tuition Fee) ही या योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्राधिकृत केलेल्या यंत्रणेमार्फत थेट संबंधित शैक्षणिक संस्थेस अदा करण्यात येईल.

(२) भारत सरकारच्या DOPT विभागाने विदेशी शिष्यवृत्तीसाठी ठरवून दिलेल्या दराप्रमाणे येणारा खर्च अथवा महाराष्ट्र शासन वेळोवेळी या प्रयोजनासाठी जाहीर करेल ती रक्कम ही निर्वाह भत्ता (Maintenance Allowance) म्हणून संबंधित विद्यार्थ्यांच्या परदेशातील वैयक्तिक खात्यामध्ये जमा केला जाईल. यासाठी खालील दराने निर्वाह भत्ता अनुज्ञेय असेल:-

(i) यु.एस.ए आणि इतर देशांसाठी तसेच यू. के. साठी प्रती वर्षासाठी केंद्र शासनाने निश्चित केल्याप्रमाणे, National Overseas Scholarship Scheme या योजनेसाठी ठरविलेल्या दराने किंवा विद्यार्थ्यांस प्रत्यक्ष येणारा खर्च यापैकी कमी असणारी रक्कम अनुज्ञेय असेल. अमेरिकेत वा इतर देशात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांकरिता प्रति वर्षी १५,४००/- अमेरिकन डॉलर मिळतील. तसेच युके (UK) मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांस प्रति वर्षी ९,९००/-जी.बी.पी. उपलब्ध करून दिले जातील. जेव्हा जेव्हा केंद्र शासन National Overseas Scholarship Scheme द्वारे या दरात बदल करेल तेव्हा तेव्हा या दरांमध्ये बदल करण्यात येईल.

(ii) विद्यार्थ्यांस परदेशी शिक्षण संस्थेंमार्फत किंवा इतर कोणत्याही यंत्रणेमार्फत मिळणारी शिष्यवृत्ती इतर कोणत्याही प्रकारचे आर्थिक लाभ किंवा शिकविण्याबाबतचे मानधन किंवा फेलोशिप किंवा रिसर्च असोसिएट म्हणून मिळणारी ही रक्कम देय होणाऱ्या या शिक्षण फी वा एकूण देय रकमेमधून कपात करण्यात येईल.

(iii) विद्यार्थ्यास परदेशातील विद्यापीठामध्ये प्रवेश घेण्यासाठी व अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर भारतात परत येण्यासाठी कमीत कमी कालावधीचा आणि जवळच्या मार्गाचा (Shortest

Route) इकॉनॉमी क्लासचा विमान प्रवासाचा दर (Air Travel Expenditure) दिला जाईल.

(iv) विद्यार्थी / उमेदवारास खालील बाबींवर होणाऱ्या खर्चाचा भार हलका व्हावा म्हणून दरवर्षी यु. एस. ए आणि इतर देशांसाठी तसेच (यू. के. वगळून) फक्त १५०० युएस् डॉलर्स, आणि यु. के. साठी फक्त ११०० जीबीपी इतका निर्वाह भत्ता / इतर खर्च आकस्मिक खर्च (Contingency Expenditure) म्हणून देण्यात येईल जसे की,
आवश्यक ती क्रमिक पुस्तके, वह्या व स्टेशनरी, प्रबंध अहवाल तयार करणे,
टायपिंग, बायडिंग, स्थानिक भेटी व इतर अभ्यास सहली प्रवास खर्च,प्रबंधासाठी आवश्यक खर्च,इतर प्रासंगिक खर्च,

(v) वरीलप्रमाणे शिक्षण फी व इतर फी, निर्वाह भत्ता आणि आकस्मिक खर्च यासाठी निर्धारीत केलेल्या दरापेक्षा कोणताही जास्तीचा खर्च अनुज्ञेय होणार नाही. निर्धारित दरापेक्षा होणारा जास्तीचा खर्च विद्यार्थी / उमेदवारास स्वत: सोसावा लागेल व अशा प्रकारचे हमीपत्र विद्यार्थ्यास व पालकांस अर्जासोबत द्यावे लागेल. अशा प्रकारचे हमीपत्र देताना प्रवासासाठी जवळचा व कमी खर्चाचा मार्ग निवडला जाईल ही बाब देखील विद्यार्थ्यास हमीपत्रात नमूद करावी लागेल.

(३) पदव्युत्तर पदवी किंवा पी.एच.डी अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षाकरिता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांस शिष्यवृत्तीचा लाभ देय राहील.

(४) ज्या विद्यापीठामध्ये / शैक्षणिक संस्थेमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे, ते विद्यापीठ / शैक्षणिक संस्था ही त्या देशातील मान्यताप्राप्त विद्यापीठ / शैक्षणिक संस्था असावी. (Accredited University / Institute) या सबंधीची कागदपत्रे विद्यार्थ्यांनी अर्जासोबत सादर करावीत. याबाबत काही वाद निर्माण झाल्यास परदेशातील भारतीय उच्चायुक्त यांच्याकडून खात्री करून समिती त्याबाबत निर्णय घेईल.

(५) अर्जात नमूद केलेले विद्यापीठ व अभ्यासक्रमासाठी काही कारणास्तव विद्यार्थी प्रवेश घेऊ शकत नसल्यास, त्याच विद्यापीठात त्याच अभ्यासक्रमासाठी पुढील एका सत्राचा (६ महिन्याचा) कालावधी, कोणतेही अतिरिक्त शुल्क न आकारता संबंधित विद्यापीठ अथवा शैक्षणिक संस्थेने विनाअट वाढवून दिल्यास आणि विद्यार्थ्यांने त्यासाठी सबळ कारण / पुरावा सादर केल्यास, अशी मुदतवाढ देण्याचे अधिकार योजनेच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त केलेल्या प्राधिकरणास असतील. तद्नंतर विद्यार्थ्यांस आणखी मुदतवाढ मिळणार नाही.

(६) एकदा निवड झालेले विद्यापीठ व अभ्यासक्रम कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही.

(७) विद्यार्थ्यांना अर्ज करतेवेळी विद्यापीठाकडून मान्य करून घेतलेल्या संपूर्ण अभ्यासक्रमासाठीच्या कालावधीच्या शिक्षण फी, निर्वाहभत्ता, आकस्मिक खर्चाची जी माहिती सादर केली आहे, त्यापेक्षा जास्तीचा खर्च अनुज्ञेय होणार नाही.

(८) अभ्यासक्रमाच्या कालावधी व्यतिरिक्त कोणत्याही परिस्थितीत वाढीव कालावधीच्या व्हिसासाठी मान्यता देण्यात येणार नाही.

(९) काही कारणास्तव विद्यार्थ्यास त्याची निवड होऊनही त्या वर्षी प्रवेश घेता आला नाही, तर त्यास वयोमर्यादेच्या अधीन राहून पुढील वर्षी नव्याने अर्ज करण्याची मुभा राहील.

(१०) परदेशातील भारतीय दूतावासात राज्य शासनाकडून संबंधित विद्यार्थ्याचा प्रगती अहवाल, वर्तणूक खर्चाचा हिशोब इ. माहिती पुरविण्याबाबत विनंती करण्यात येईल. तसेच काही विपरीत बाबी असल्यास,

परदेशातील भारतीय दूतावास त्या बाबी राज्य शासनास कळवतील. परदेशात प्रवेशित विद्यार्थ्याच्या प्रगतीविषयी मार्गदर्शन व सल्ला देणेबाबत परदेशातील दुतावासास विनंती करण्यात येईल. त्याचबरोबर या विद्यार्थ्यांना परदेशात काही अडचणी उद्भवल्यास मदत करण्यासाठी संबंधित भारतीय दूतावासांना विनंती करण्यात येईल. विद्यापीठात / शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थी तात्काळ तेथील भारतीय परदेशी दूतावासास संपर्क साधून आपली नोंदणी करेल व त्याचा तपशील योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या प्राधिकरणाकडे सादर करेल.

(११) विद्यार्थ्यांना कोणत्या दिनांकास व कोणत्या विमानाने परदेशात जाणार आहे, याची लेखी माहिती ही योजना अंमलबजावणी करणाऱ्या प्राधिकरणाकडे सादर करणे आवश्यक आहे. ही माहिती न देता विद्यार्थी परदेशात गेल्यास त्यास विमान खर्च अनुज्ञेय होणार नाही.

(१२) आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, उपस्थिती, वर्तणूक, खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र व इतर तद्नुषंगिक बाबींचा अहवाल परदेशातील भारतीय दूतावासाकडून प्राप्त करून घेण्यात येईल.

(११) अभ्यासक्रमाचा कालावधी संपल्यानंतर परदेशातील वास्तव्यासाठी कोणताही पत्रव्यवहार शासनाकडे किंवा योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या प्राधिकरणाकडे केला जाणार नाही. विद्यार्थी किंवा त्याच्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीने केलेला असा पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

(१२) परदेशी विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेण्यासाठी GRE (Graduate Record Examination), TOFEL (Test of English as a foreign language), IELTS (International English Language Testing System) इ. प्रकारच्या परीक्षा जेथे अनिवार्य आहेत, त्या उत्तीर्ण होणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक असेल.

(१३) विद्यार्थ्यांने शिष्यवृत्तीसाठी अर्जामध्ये नमूद केलेले विद्यापीठ व अभ्यासक्रम, त्यांचा कालावधी आणि खर्चाचे तपशील यामध्ये निवड समितीने निवडीची शिफारस केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही.

(१४) पी. एच. डी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याने ज्या विषयाची संशोधनासाठी निवड केली आहे, त्या विषयाचा, भारतीयांमध्ये कोणत्याही विद्यापीठामध्ये अंतिम प्रबंध अहवाल (Thesis) सादर केला नसल्याबाबतचे घोषणापत्र (Declaration) सादर करणे आवश्यक आहे.

**१०) <u>अर्ज करण्याची पद्धत :-</u>**

(१) सदर शिष्यवृत्तीसाठी प्रत्येक वर्षी एप्रिल महिन्यात महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभाग किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्राधिकरणामार्फत वृत्तपत्रात तसेच शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीरात प्रसिद्ध केली जाईल.

(२) सदरची योजना अल्पसंख्याक विकास विभागाची असली तरी या शासन निर्णयातील नियमावली, अटी व शर्तीनुसार योजनेची अंमलबजावणी व कारवाई योजनेसाठी प्राधिकृत केलेल्या प्राधिकरणामार्फत करण्यात येईल.

(३) सदर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत किंवा प्रत्येक वर्षी जास्तीत जास्त ३१ मे अखेर उमेदवारांनी विहीत नमुन्यातील परिपूर्ण भरलेले अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह ऑनलाईन / ऑफ लाईन मूळ कागदपत्रासह सादर करावेत. अभ्यासक्रम निहाय असलेल्या आरक्षणाच्या अधीन राहून, निवड समितीने निश्चित केलेली पात्र विद्यार्थ्यांची निवड यादी दिनांक १ जूलै पूर्वी अथवा निवड समितीच्या निर्णयानंतर शासन जाहीर करील.

(४) शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर १५ जुलै पर्यंत संबंधित विद्यार्थ्यांना कळवून त्यांच्याकडून आवश्यक ती अतिरिक्त माहिती मागविण्यात येईल. तसेच या विद्यार्थ्यांची गृहचौकशी करण्यात येईल.

**११) सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे:**

I. विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्ज.

II. अर्जदार अल्पसंख्याक असल्याबाबतचा पुरावा.

III. सक्षम प्राधिकाऱ्यानी दिलेला उत्पन्नाचा दाखला.

IV. पदवी/पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे पुरावे (सनद/गुणपत्र)

V. परदेशातील QS World Ranking २०० च्या आतील शैक्षणिक संस्थेमध्ये विनाअट प्रवेश मिळाला असल्याबाबतचे पत्र (Unconditional) ऑफर लेटर.

VI. ज्या विद्यापिठामध्ये प्रवेश मिळाला आहे त्याच्या सविस्तर माहिती पत्रकाचे पत्र Prospect

VII. आवश्यक ते करारनामे व हमीपत्रे.

VIII. संपुर्ण अभ्यासक्रम होण्यासाठी वर्षनिहाय खर्चाचे अंदाजपत्रक. जाण्या-येण्याचा विमान प्रवास, राहण्याचा खर्च याचा समावेश असावा.

IX. वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी परदेशातील विद्यापिठामध्ये प्रवेश घेणार असेल त्या विद्यापिठास व अभ्यासक्रमास भारतीय आयुर्विज्ञान परिषदेची मान्यता असणे आवश्यक आहे.

X. नोकरीमध्ये असलेल्या उमेदवारांनी तो जेथे नोकरी करतो त्या यंत्रणेचे (Organization/ Employer) नाहरकत प्रमाणपत्र दाखल करणे अनिवार्य आहे.

XI. विद्यार्थी, शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या कालावधीसाठी किंवा शिक्षण त्यापूर्वी पूर्ण झाल्यास जो कालावधी लागेल, या दोघांपैकी जो कमी आहे, त्या कालावधी पुरतेच परदेशात राहण्याचे बंधपत्र (Bond) राज्य शासनास तसेच परदेशातील भारतीय दूतावासास लिहून देईल. या आवश्यक कालावधीपेक्षा जास्त कालावधीकरीता परदेशात राहण्यास विद्यार्थ्यांस परवानगी मिळणार नाही

XII. उमेदवारास / विद्यार्थ्यांस शासनाने विहीत करुन दिलेल्या नमुन्यात Record Release Consent Form हा बंधपत्राच्या स्वरुपात द्यावा लागेल.

XIII. ज्या विद्यार्थ्यांना परदेशी शैक्षणिक संस्थांकडून Unconditional Offer Letter मिळालेले असेल, त्यांनाच ही शिष्यवृत्ती अनुज्ञेय राहील. यासाठी conditional Offer Letter गृहीत धरले जाणार नाही.

**(१२) <u>विद्यार्थ्यांची कर्तव्ये व त्यांना अपात्र ठरवू शकणारी कारणे</u>**

(१) विद्यार्थ्यांस वरील लाभ मिळण्यासाठी परदेशातील प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमामध्ये प्रत्येक वेळी उत्तीर्ण होणे बंधनकारक असून तसेच शैक्षणिक संस्था / विद्यापीठाचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, प्रगती अहवाल प्रत्येक सत्रासाठी किंवा सहा महिन्यासाठी सादर करणे अनिवार्य आहे.

(२) प्रवेशित विद्यार्थ्याने प्रत्येक सहा महिन्याच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे (Utilization Certificates), खर्चाच्या पावत्या इ. विद्यापीठ / शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाकडून प्रमाणित करून सादर करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय शिष्यवृत्ती पुढील रक्कम अनुज्ञेय होणार नाही.

(३) सुरूवातीस परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेणे आणि विहीत कालावधीत अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्वरित कालमर्यादेत भारतात परत येण्यासाठी नजिकच्या मार्गाने इकॉनॉमी क्लासचे विमान प्रवास भाडे देण्यात येईल. त्यासाठी विमान प्रवासाचे मूळ तिकीट, मूळ बोर्डींग पास, परतीचे प्रवासभाडे मिळण्यासाठी अभ्यासक्रम विहीत कालावधीत यशस्वीपणे पूर्ण केल्याचा पुरावा इ. कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

(४) अपवादात्मक प्रसंगी, विद्यार्थ्यांनी / पालकांनी, परदेशी शिक्षण संस्था/ विद्यापीठात शिक्षण फी / इतर अनुज्ञेय फी स्वत: भरलेली असेल, अशावेळी आवश्यक त्या पावत्या व पुरावे सादर करावे, त्यानंतर अशा रकमा विद्यार्थ्यांस देय होणाऱ्या शिष्यवृत्तीमधून विद्यार्थ्यांच्या परदेशातील खात्यावर योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या प्राधिकरणाकडून जमा करण्यात येईल.

(५) विद्यार्थ्यांने भारतात राष्ट्रीयकृत बँकेत व परदेशात अधिकृत बँकेत खाते उघडणे अनिवार्य आहे. त्याच खात्यावर त्यांना देय होणारी शिष्यवृत्ती CMP किंवा RTGS किंवा SWIFT ने अदा केली जाईल. या खात्याचा तपशील त्याने परदेशात जाऊन प्रवेश घेतल्यानंतर योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या प्राधिकरणाकडे तातडीने सादर करावा.

(६) परदेशी शिक्षण संस्था / विद्यापीठाने ऑफर लेटरमध्ये संपूर्ण अभ्यासक्रम कालावधीच्या निर्धारीत केलेल्या फीच्या मर्यादेतच लाभ संबंधित विद्यार्थ्यांस अनुज्ञेय होतील. भविष्यात त्यामध्ये वाढ झाल्यास परदेशातील भारतीय उच्चायुक्तालयाच्या शिफारशीनंतरच ही वाढ संबंधित विद्यार्थ्यास अनुज्ञेय असेल.

(७) प्रत्येक सहा महिन्यांनी विद्यार्थ्यांना शिष्यवृतीचे (शिक्षण फी, परीक्षा फी, निर्वाह भत्ता इ. चे) उपयोगिता प्रमाणपत्र आणि प्रगती अहवाल योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या प्राधिकरणाकडे सादर केल्यानंतर पुढील ६ महिन्यांची शिष्यवृत्ती अदा करण्यात येईल. प्रत्येक ६ महिन्यांनी विद्यार्थ्याचा शैक्षणिक प्रगती अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र / खर्चाचा अहवाल प्राप्त झाल्याशिवाय संबंधित विद्यार्थ्यांस पुढील शिष्यवृत्ती अनुज्ञेय होणार नाही.

**१३) <u>विद्यार्थ्यांची अपात्रता</u>:-**

**(अ)<u>कर्तव्यात कसूर</u>** ( Default under the scheme)

१) या योजनेखाली निवड झालेल्या शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेताना नियमांचे तसेच अटी व शर्तीचे आणि बंधपत्रामध्ये लिहून दिलेल्या बाबींचे उल्लंघन केल्यास किंवा परदेशी शैक्षणिक संस्थेने अभ्यासाविषयी / वागणूकीविषयी / गैरहजेरीविषयी प्रतिकूल अहवाल दिल्यास किंवा विद्यार्थ्याने प्रवेश अर्धवट सोडला असल्यास, किंवा विद्यार्थ्यांने जेथे प्रवेश घेतला आहे तो देश सोडून निघून गेला असल्यास किंवा विद्यार्थ्यांने दुसऱ्या विद्यापीठ / शैक्षणिक संस्थेमध्ये विना परवानगी प्रवेश घेतला असल्यास, किंवा विद्यार्थ्यांची ज्या अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे, तो अभ्यासक्रम त्याने विनापरवानगी बदलल्यास, किंवा तो भारतात कोणत्याही प्रकाराची परवानगी न घेता परत आल्यास, विद्यार्थ्याने कर्तव्यात कसूर केल्याचे (Defaulter) समजण्यात येईल.

२) कोणतेही कारण अथवा सबबी सांगून अभ्यासक्रम पूर्ण न करणे किंवा विहित प्रयोजनासाठी खर्च न करणे किंवा खर्चात काटकसर न करणे किंवा विहीत लाभ मर्यादेपेक्षा जास्तीची मागणी परदेशात जावून करणे किंवा कोणत्याही प्रकारचा दबाब आणणे किंवा धमकी देणे किंवा सदर नियमावलीतील तरतुदींचे उल्लंघन करणे किंवा परदेशातील नियम / अटी तरतुदींचे उल्लंघन करणे / वाममार्गास लागणे किंवा परदेशातील शैक्षणिक कालावधीत कोणत्याही प्रकाराचे

गैरकृत्य करणे किंवा अशा गैरकृत्यासाठी दंड / शिक्षा होणे किंवा भारतीय राष्ट्रीयत्वास हानी पोहचविणे किंवा भारताची बदनामी करणे याबाबी कर्तव्यातील कसूर समजण्यात येतील.

वरीलप्रमाणे कर्तव्यात कसूर झाल्यास त्याला देण्यात आलेली शिष्यवृत्तीची सर्व रक्कम दरसाल दर शेकडा १२ % व्याजाने वसूल करण्यात येईल, अशा आशयाचे विद्यार्थी व पालक यांचे संयुक्त हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील. कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी अशा विद्यार्थ्यांकडून १२% व्याजासह त्याच्यासाठी शासनामार्फत झालेला खर्च वसूल करण्यात येईल.

**(ब) खोटी माहिती सादर करणे:-**

कोणत्याही विद्यार्थ्याने / उमेदवाराने खोटी माहिती / कागदपत्रे सादर केल्याचे सिद्ध झाल्यास अथवा उपरोक्त उपपरिच्छेद (अ) प्रमाणे कर्तव्यात कसुर केल्यास, त्यास ताबडतोब पुढील शिक्षणासाठी अटकाव (Debar) केला जाईल व त्याच्यासाठी झालेल्या शासनाच्या खर्चाची रक्कम १५% चक्रवाढ व्याजासह वसूल करण्यात येईल. अशा विद्यार्थ्याचा / उमेदवाराचा काळया यादीत समावेश केला जाईल. तसेच प्रचलित कायद्यानुसार त्याच्या विरूद्ध कारवाई करण्यात येईल. आणि त्यांनी दिलेले जामीनदार आणि संदर्भ अधिकारी / व्यक्ती यांना सुद्धा ही बाब लेखी स्वरूपात कळविण्यात येईल.

**(क) कायदेशीर बाबी:-**

या संदर्भात कोणत्याही कायदेशीर बाबी उद्भवल्यास, त्या मुंबई उच्च न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात असतील. परदेशात उद्भवलेल्या कायदेशीर बाबीसाठी परदेशातील भारतीय उच्चायुक्त कार्यवाही करतील.

**(१४) योजनेच्या अनिवार्य अटी:-**

(१) विवाहीत उमेदवाराच्या पत्नी / पती व मुले पालक वा नातेवाईक यांना परदेशामध्ये सोबत घेवून जाण्यासाठी कोणत्याही प्रकारचे सहाय्य दिले जाणार नाही. त्यासाठी पासपोर्ट मिळविणे, व्हिसा मिळविणे, आर्थिक तरतुद करणे, परदेशातीत निवास व दैनंदिन खर्चाची व्यवस्था करणे ही उमेदवाराची वैयक्तिक जबाबदारी असेल.

(२) नोकरी करणाऱ्या उमेदवारांनी सर्व प्रशासकीय बाबी उदा. रजा, वेतन आणि सेवेच्या इतर बाबी या स्वत: प्रत्यक्षपणे निराकरण करून घ्यावयाच्या आहेत. याबाबत कोणत्याही प्रकारची सवलत शासनाकडून मिळणार नाही.

(३) (i) अचानक उद्भवलेल्या परिस्थितीमध्ये, परदेशामध्ये शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांस भारतामध्ये यावयाचे असल्यास त्यासाठी त्याने संबंधित शैक्षणिक संस्था आणि राज्य शासनाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक असेल आणि याबाबतची माहिती संबंधित विद्यार्थी भारतीय दूतावासास कळवतील.

(ii) जेवढया कालावधीमध्ये विद्यार्थी परदेशातील शैक्षणिक संस्थेमधून दूर असेल, तेवढया कालावधीचा कोणताही खर्च त्यास अनुज्ञेय होणार नाही. तथापि, तो पुन्हा त्याच शैक्षणिक संस्थेत त्याच अभ्यासक्रमाचे पुढील शिक्षण पूर्ण करण्यासाठी हजर झाल्यास हजर झालेल्या दिवसापासून त्यास उर्वरित देय लाभ अनुज्ञेय होतील.

(iii) अशा परिस्थितीत विद्यार्थ्याने परत त्याच परदेशी शिक्षण संस्थेमध्ये हजर न होता शिक्षण अर्धवट सोडल्यास त्यास अदा करण्यात आलेले शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क इतर शुल्क व निर्वाह भत्ता याची व्याजासह वसुली करण्यात येईल, या आशयाचे लेखी हमीपत्र विद्यार्थ्यास / उमेदवारास शिष्यवृत्ती मंजुरीपूर्वी द्यावे लागेल.

(४) पासपोर्ट व व्हिसा मिळविण्याची जबाबदारी उमेदवार / विद्यार्थी याची असेल.

(५) उमेदवारास / विद्यार्थ्यांना केवळ ज्या शैक्षणिक संस्थेमध्ये, ज्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळालेला आहे व शिष्यवृत्ती मिळाली आहे, केवळ त्याच कारणासाठी व्हिसा घेणे बंधनकारक असेल.

(६) निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी मागणी केल्यानुसार आवश्यक ती कागदपत्रे सादर करणे व आवश्यक ते करारनामे देणे बंधनकारक असेल.

(७) निवड झालेल्या विद्यार्थ्यास / उमेदवारास त्याच्या शैक्षणिक कालावधीमध्ये जास्तीची रक्कम अदा झाली असल्यास त्याची परतफेड करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक असेल अथवा ती वसूल करण्याबाबत प्रचलित कायदे व नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबतचा उल्लेख हमीपत्रामध्ये करणे बंधनकारक असेल.

(८) सदर शिष्यवृत्तीबाबत महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विभागाने घेतलेला निर्णय अंतिम असेल.

**(१५) <u>इतर अटी व शर्ती:-</u>**

(१) अभ्यासक्रम संपल्यानंतर या योजने अंतर्गत विद्यार्थ्यांस व्हिसा मुदत वाढीसाठी परवानगी दिली जाणार नाही. <u>अभ्यासक्रमाचा कालावधी कोणत्याही कारणास्तव वाढल्यास त्यासाठी अतिरिक्त निधी दिला जाणार नाही.</u>

(२) परदेशात शिक्षणासाठी निवड झाल्यानंतर प्रवेश घेण्यासाठी जाताना व अभ्यासक्रम संपल्यानंतर परदेशातून भारतात येण्याचा खर्च नजीकच्या मार्गाचा व इकॉनॉमिक वर्गाच्या मर्यादेत एकदाच देण्यात येईल.

(३) वर बाब (१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे अभ्यासक्रम निहाय विद्यार्थी प्रवेश संख्या निर्धारीत केलेली असून त्यामर्यादेत विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल. सदर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्याची निवड करताना निवड समितीने अभ्यासक्रमांसाठी पदव्युत्तर पदवी व पी.एच.डी करीता राखुन ठेवलेल्या अभ्यासक्रमांसाठी बाब (१) नुसार निवड करावी. निर्धारीत केलेल्या प्रत्येक अभ्यासक्रमासाठी संपूर्ण राज्याची स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार करावी व गुणवत्तेप्रमाणे आरक्षित कोट्याच्या मर्यादेच्या अधीन राहून शासन निर्णय निर्गमित करण्यासाठी शासनास शिफारस करावी. ही गुणवत्ता विद्यार्थ्यांने प्रवेश घेतलेल्या शैक्षणिक संस्थांच्या अद्ययावत जागतिक क्रमवारीनुसार (QS World Ranking) प्रमाणे असेल.

**(१६) <u>निवडीची कार्यपद्धती:-</u>**

परदेशातील शैक्षणिक संस्था / विद्यापीठाची जागतिक क्रमवारी (QS World Ranking) जेष्ठताक्रम हाच विद्यार्थी निवडीचा मुख्य निकष असेल. उच्च Q.S. जागतिक क्रमवारीच्या शैक्षणिक संस्थेतील प्रवेशित विद्यार्थी हा या शासन निर्णयाच्या सुरूवातीस आभ्यासक्रम सदरातील विद्याशाखा / अभ्यासक्रम कोट्याच्या आरक्षणाच्या अधीन राहून निवडला जाईल.

निवड करताना समान (टाय) गुणवत्ता असलेल्या प्रकरणी वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारांची निवड करण्यात येईल.

**१७) <u>निवड प्रक्रिया :-</u>**

या विभागाच्या या शिष्यवृतीसाठी विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्यासाठी खालीलप्रमाणे **छाननी समिती** असेल :-

१) आयुक्त,समाज कल्याण, पुणे - अध्यक्ष
२) सह संचालक उच्च शिक्षण - सदस्य

३) सह संचालक तंत्र शिक्षण - सदस्य
४) सह संचालक वैद्यकीय शिक्षण - सदस्य
५) संचालक कृषी - सदस्य
(महाराष्ट्र राज्य कृषी संशोधन व प्रशिक्षण परिषद)
(६) सह आयुक्त (शिक्षण), समाज कल्याण, पुणे -सदस्य
(७) सह/उप सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, - सदस्य सचिव
मंत्रालय, मुंबई.

उपरोक्त समिती प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून अभ्यासक्रमनिहाय पदव्युत्तर पदवी व डॉक्टरेटसाठी राखीव कोट्यानुसार आणि परदेशातील विद्यापीठ / शैक्षणिक संस्थेच्या जागतिक क्रमवारीच्या ज्येष्ठतेनुसार पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव निवड समितीकडे अंतिम करण्यासाठी पाठवेल. छाननी समितीमार्फत प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या यादी / प्रस्तावामधून पात्र विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यासाठी निवड समितीची रचना खालीलप्रमाणे असेल:-

अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव ,
अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय मुंबई. - अध्यक्ष

१) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, -सदस्य

२) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव ,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई - सदस्य
३) संचालक तंत्र शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई - सदस्य
४) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय - सदस्य
५) आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे - सदस्य सचिव

निवड समितीने सदर शिष्यवृत्तीसाठी शिफारस केलेल्या विद्यार्थ्यांच्या निवडीचा शासन आदेश, अल्पसंख्याक विकास विभागाकडून निर्गमित करण्यात येईल व तो पुढील कार्यवाहीसाठी सामाजिक न्याय विभागाकडे पाठविण्यात येईल. तसेच निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे आभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी व दर्जा वाढीसाठी आवश्यक असलेले शिथिलीकरण करण्याचे अधिकार अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना असतील.

परदेशी शिक्षणाकरिता शिष्यवृती मिळण्यासाठी अर्ज करणारा विद्यार्थी व अर्ज स्विकृत करणाऱ्या प्रक्रियेतील व्यक्ती किंवा छाननी समितीतील सदस्य यांचे किंवा निवड समितीतील सदस्य यांचे कोणतेही नातेसंबंध / संबंध असल्यास अशी व्यक्ती किंवा छाननी समितीतील सदस्य किंवा निवड समितीतील सदस्य या संपुर्ण प्रक्रियेपासून दूर राहील. अशा प्रकरणी त्या व्यक्ती किंवा सदस्य यांच्याऐवजी अन्य व्यक्ती किंवा सदस्याची नेमणूक करण्यात येईल. अर्ज स्वीकृतीपासून निवड प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या प्रक्रियेशी अशा व्यक्ती/सदस्यास या प्रक्रियेपासून दूर न ठेवता प्रक्रिया पूर्ण केली असल्याचे आढळून आल्यास सदरची प्रक्रिया संबंधीत व्यक्तीस बदलून पुन्हा पार करण्यात येईल.

निवड समितीने सदर शिष्यवृत्तीसाठी शिफारस केलेल्या विद्यार्थ्यांच्या निवडीचा शासन आदेश शासन स्तरावरून निर्गमित करण्यात येईल.

हा शासन निर्णय वित्त व नियोजन विभागाच्या मान्यतेने व सहमतीने निर्गमित करण्यात येत असून नियोजन विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र. ३१२/१४७१ दि.२३.१०.२०२३ व वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.

३२४/२३/व्यय-१ दि.१३.११.२०२३ असा आहे. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा सांकेताक क्रमांक २०२३११२३१५२१४६९११४ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MOHINUDDIN B TASHILDAR

Digitally signed by MOHINUDDIN B TASHILDAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MINORITIES DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=7eac303551c8c1c40121e24c1d7fb18a03efe22c688ba9240e47d3c712ae3ea9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7E694259001AF4DCAD48B69EB7E39AFC9472E61C49FC40EB7D603AE236006903, cn=MOHINUDDIN B TASHILDAR
Date: 2023.11.28 12:17:21 +05'30'

**(मो. बा. ताशिलदार)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्र्याचे अप्पर मुख्य सचिव
३. मा. उपमुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव
४. मा. मंत्री / मा. राज्यमंत्री अल्पसंख्याक विकास यांचे खाजगी सचिव
५. मा. संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य
६. सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
७. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
८. मा. विधानसभा / विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधापमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
९. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
१०. सर्व विभागीय आयुक्त
११. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१२. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. अपर मुख्य सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. प्रधान सचिव, वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई.
१५. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. महालेखापाल १ / २ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
१७. महालेखापाल १ / २ (लेखापरीक्षा), मुंबई / नागपूर.
१८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१९.भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी. डी. बॅरके नं. १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईट, मुंबई ४०००२०.
२०. इंडियन नॅशनल कॉग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०००२५.
२१. नॅशनलीस्ट कॉग्रेस पार्टी, ठाकरशी हाऊस, जे. एन. हेरेडीया मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई-४०००३८.
२२. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०००२८.
२३. बहुजन समाज पार्टी, प्रदेश सचिव, महाराष्ट्र राज्य, बी. एस. जी. भवन. प्लॉट नं. ८३-अे, कलेक्टर कॉलनी, चेंबेर, मुंबई-४०००१४.
२४. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस. व्ही. पटेल रोड, मुंबई-४००००४.
२५. भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-४०००१३.

२६. महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राज गड मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर मुंबई -२८
२८. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
२९. अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
३०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
३१. सर्व जिल्हा कोषागार, अधिकारी
३२.संचालक, (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
३३.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
३४.संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई
३५.सर्व विभागीय उपसंचालक (प्राथमिक)
३६.सचिव, महाराष्ट्र राज्य, अल्पसंख्याक आयोग
३७.व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई
३८.व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई
३९.सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, अल्पसंख्यांक विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
४०. अवर सचिव (अर्थसंकल्प शाखा), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४१.निवडनस्ती.

राज्यातील अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांकरिता परदेशात पदव्युत्तर पदवी व पी.एच.डी. अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती योजना.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
**शासन पुरकपत्र क्रमांक: अविवि २०१९ / प्र.क्र.२११ / का-६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २० जून, २०२४

**वाचा :- शासन निर्णय क्रमांक: अविवि २०१९ / प्र.क्र.२११ / का-६, दिनांक २३.११.२०२३.**

**शासन पुरकपत्र :-**

उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये, परिच्छेद क्र. ७ नंतर खालीलप्रमाणे परिच्छेद क्र. ७ (अ) चा समावेश करण्यात येत आहे.

**७ (अ) परदेशी शिष्यवृत्तीकरिता मंजूर करण्यात येणारे अभ्यासक्रम:-**

| Science, Technology, Engineering and Mathematics | | Medicine and Biology | Agriculture | Liberal Art & Humanities | Law & Commerce |
|---|---|---|---|---|---|
| *Permissible Courses:- P.G./ Ph.D. | | *Permissible Courses:- P.G./ Ph.D. | *Permissible Courses:- P.G./ Ph.D. | *Permissible Courses:- P.G./ Ph.D. | *Permissible Courses:- P.G./ Ph.D. |
| 1 | | 2 | 3 | 4 | 6 |
| 1. | 1. Civil | 1. M. Pharm | 1. Agriculture | 1.Sociology | 1.L.L.M. |
| 2. | Mechanical | 2. Public Health | 2. Agricultural Economics | 2.Psychology | 2. MBA in Finance/ Marketing/ H.R./ System Analysis |
| 3. | Electrical | 3. Microbiology | 3. Horticulture | 3.Philosophy | |
| 4. | Chemical | | 4. Animal Husbandry | 4.Economics | |
| 5. | Computer | | | 5. Commerce | |
| 6. | Production | | | 6. Applied Art | |
| 7. | Industrial Engg. | | | 7. Fine Art | |
| 8. | Environmental Engineering | | | 8. Literature | |
| 9. | Mining Engg. | | | | |
| 10. | Petrochemical | | | | |
| | Electronic & TC | | | | |
| | Information Technology/ Information System/ Information Science/ | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Computer Engineering | | | | |
| 11. | Bio-Technology | | | | |
| 12. | Genetic Engineering | | | | |
| 13. | Nano Technology | | | | |
| 14. | Industry Internet of Things (IIOT) | | | | |
| 15. | Cyber Law/Cyber Security | | | | |
| 16. | Biomedical Engg. | | | | |
| 17. | Climate Change | | | | |
| 18. | Artificial Intelligence | | | | |
| 19. | Reversible energy | | | | |
| 20. | Climate Change | | | | |
| 21. | Data Analyasis | | | | |
| 22. | Cloud Computing | | | | |
| 23. | General Science | | | | |
| 24. | Maths | | | | |
| 25. | Physics | | | | |
| 26. | Chemistry | | | | |
| 27. | Botany | | | | |
| 28. | Zoology | | | | |
| 29. | Statistics | | | | |
| 30. | Physics | | | | |

टिप.

१. Only accredited Universities/Institutions of Foreign Countries will only be considered.

२. वरील अभ्यासक्रम हे निर्देशनात्मक असून विद्यार्थ्यांने परदेशी विद्यापीठामध्ये प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाचा समावेश कोणत्या शाखेकरीता करावयाचा याचा निर्णय घेण्याचे अधिकार निवड समितीस राहतील.

२. शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. ११ नंतर खालीलप्रमाणे परिच्छेद क्र. ११ (अ) चा समावेश करण्यात येत आहे.

**(११) (अ) गुणवत्ता यादी व विद्यार्थ्यांची निवड यादी तयार करण्याची कार्यपद्धती :-**

शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणा-या विद्यार्थ्यांपैकी इतर सर्व अटींची पूर्तता होणा-या विद्यार्थ्यांच्या प्राप्त गुणांचे मुल्यांकन खालील प्रमाणे करून त्याचे एकूण गुण विचारात घेऊन गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

I) **पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाकरिता :**

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेला अभ्यासक्रम | प्राप्त केलेले गुण | गुणांचे मुल्यांकन |
|---|---|---|---|
| १ | SSC | ५५ ते ७५% | ५ |
| | | ७५% पेक्षा जास्त | १० |
| २ | HSC | ५५ ते ७५% | ५ |
| | | ७५% पेक्षा जास्त | १० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | पदवी | ५५ ते ७५% | ५ |
| | | ७५% पेक्षा जास्त | १० |
| ४ | QS World Ranking Average | १ ते ५० | ५० |
| | | ५१ ते १०० | ४० |
| | | १०१ ते १५० | ३० |
| | | १५१ ते २०० | २० |

II) **डॉक्टरेट अभ्यासक्रमाकरिता :**

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेला अभ्यासक्रम | प्राप्त केलेले गुण | गुणांचे मुल्यांकन |
|---|---|---|---|
| १ | SSC | ५५ ते ७५% | ५ |
| | | ७५% पेक्षा जास्त | १० |
| २ | HSC | ५५ ते ७५% | ५ |
| | | ७५% पेक्षा जास्त | १० |
| ३ | पदवी | ५५ ते ७०% | ५ |
| | | ७० ते ८५% | १० |
| | | ८५% पेक्षा जास्त | २० |
| ४ | पदव्युत्तर पदवी | ५५ ते ७०% | ५ |
| | | ७० ते ८५% | १० |
| | | ८५% पेक्षा जास्त | २० |
| ५ | QS World Ranking Average | १ ते ५० | ५० |
| | | ५१ ते १०० | ४० |
| | | १०१ ते १५० | ३० |
| | | १५१ ते २०० | २० |

(१) मूळ शासन निर्णयातील मुद्दा क्र. ७ प्रमाणे अभ्यासक्रमनिहाय विद्यार्थी प्रवेश संख्या निर्धारीत केलेली असून त्या मर्यादेत विद्यार्थ्यांची निवड करावयाची आहे. त्यामुळे, निर्धारीत केलेल्या सर्व अभ्यासक्रमांसाठी प्रथमतः वरील "I" व "II" करीता दोन स्वतंत्र एकत्रित गुणवत्ता याद्या तयार कराव्यात.

(२) अ) गुणवत्ता यादी तयार करतांना समसमान (Tie) गुणवत्ता असलेल्या प्रकरणी QS World Ranking जेष्ठताक्रम असलेल्या विद्यार्थ्यास गुणवत्ता यादीत वरचे स्थान देण्यात यावे.

ब) त्यानंतरही समसमान गुण असल्यास पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरीता पदवी अभ्यासक्रमाचे आणि पीएचडी अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेतलेल्य विद्यार्थ्यांकरीता पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे गुण विचारात घेण्यात यावेत.

क) त्यानंतरही समसमान गुणवत्ता असल्यास वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारास वरचे स्थान देण्यात यावे.

(३) मात्र, गुणवत्ता यादीमध्ये समसमान गुणवत्ता असलेल्या अभियांत्रिकी व विज्ञान या शाखेच्या प्रकरणी वरील २ ब) व २ क) चा विचार न करता या विद्यार्थ्याची निवड करताना Emerging areas of science and technology चा प्राधान्याने विचार केला जाईल. उदा. Atmospheric sciences, Adaptation and mitigation of Climate Change, Automation and Artificial Intelligence, Renewable

Energy, Energy Efficiency Techniques, Biotechnology, Nano Technology, Industry Internet of Things, Data Analytics, Cloud Computing, Cyber Security इ. अभ्यासक्रमांना प्राधान्य दिले जाईल.

(४) गुणवत्ता याद्या तयार केल्यानंतर मूळ शासन निर्णयातील मुद्दा क्र. ७ प्रमाणे शाखानिहाय पात्र विद्यार्थ्यांची निवड करण्यात यावी. ही निवड करताना एकूण लाभार्थी विद्यार्थ्यांमध्ये ३०% विद्यार्थिनींची निवड करणे आवश्यक आहे.

(५) निवड यादीस शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ते आदेश निर्गमित करण्यात येतील.

३. परदेश शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी सादर करावयाचा अर्जाचा नमूना व हमीपत्राचा नमूना :-

परदेश शिष्यवृत्तीसाठी लागणारा अर्जाचा नमूना संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये परिशिष्ट "अ" मध्ये नमूद करण्यात आला आहे. तसेच हमीपत्राचा नमूना परिशिष्ट "ब" मध्ये नमूद करण्यात आलेला आहे.

४ सदर शासन पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले असून त्याचा सांकेताक क्रमांक २०२४०६२०१६३६४८५६१४ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MOHINUDDIN B TASHILDAR

Digitally signed by MOHINUDDIN B TASHILDAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MINORITIES DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=7eac303551c8c1c40121e24c1d7fb18a03efe22c688ba9240e47d3c712ae3ea9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7E694259001AF4DCAD48B69EB7E39AFC9472E61C49FC40EB7D603AE236006903, cn=MOHINUDDIN B TASHILDAR
Date: 2024.06.20 16:52:42 +05'30'

**(मो. बा. ताशिलदार)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्र्याचे अप्पर मुख्य सचिव
३. मा. उपमुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव
४. मा. मंत्री / मा. राज्यमंत्री अल्पसंख्याक विकास यांचे खाजगी सचिव
५. मा. संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य
६. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
७. सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
८. मा. विधानसभा / विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधापमंडळ राचिवालय, विधानभवन, मुंबई.
९. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
१०. सर्व विभागीय आयुक्त
११. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१२. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. अपर मुख्य सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
१७. महालेखापाल १/२ (लेखापरीक्षा), मुंबई / नागपूर,

१८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

१९. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी. डी. बॅरके नं. १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक,नरिमन पॉईट, मुंबई ४०००२०.

२०. इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग,दादर, मुंबई-४०००२५.

२१. नॅशनलीस्ट कॉंग्रेस पार्टी, ठाकरशी हाऊरा, जे. एन. हेरेडीया गार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई-४०००३८.

२२. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०००२८.

२३. बहुजन समाज पार्टी, प्रदेश सचिव, महाराष्ट्र राज्य, बी. एस. जी. भवन, प्लॉट नं. ८३-अ, कलेक्टरकॉलनी, चेंबेर, मुंबई ४०००१४.

२४. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस. व्ही. पटेल रोड, मुंबई-४००००४,

२५. भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी,मुंबई-४०००१३.

२६. महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राज गड मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर मुंबई-२८

२७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई. २९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

२८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई, ३१. सर्व जिल्हा कोषागार, अधिकारी

२९. संचालक, (उच्च शिक्षण, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे

३०. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई

३१. संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई

३२. सर्व विभागीय उपसंचालक (प्राथमिक)

३३. सचिव, महाराष्ट्र राज्य, अल्पसंख्याक आयोग

३४. व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई

३५. व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई

३६. सह सचिव / उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

३७. अवर सचिव (अर्थसंकल्प शाखा), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

३८. निवडनस्ती.

## परिशिष्ट- अ

## -अर्जाचा नमुना-

***अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांकरिता परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी परदेश शिष्यवृत्ती योजना- सन २०२४-२५ साठी अर्ज.***

| अर्जदाराचा फोटो (स्व साक्षांकित) |
|---|

प्रति,
मा. आयुक्त,
समाज कल्याण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, ३, चर्च पथ, पुणे- ४११ ००१.

**विषय :** अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांकरिता परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी परदेश शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज सादर करणेबाबत... (सन २०२४-२५)

महोदय,

अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांकरिता परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी परदेश शिष्यवृत्ती योजना या योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती मिळण्यासाठी मी माझी वैयक्तिक व कुटुंबाची माहिती या अर्जाव्दारे खालीलप्रमाणे सादर करीत असून मला सदर शिष्यवृत्ती मंजूर करण्यात यावी, अशी विनंती आहे.

अ) अर्जदाराची सर्वसाधारण माहिती:-

| | | |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्याचे संपूर्ण नांव :- | |
| अ. | ज्या अभ्यासक्रमासाठी दावा करु इच्छितो त्या अभ्यासक्रमाचा प्रकार व शाखा- (PG/PhD) | अ) PG/PhD:- |
| ब. | विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी व गणित/ औषधी व जैवशास्त्र/ लिबरल आर्ट व ह्युमॅनिटीज/ शेतकी/ कायदा व वाणिज्य यापैकी लागु असेल ते नमुद करावे. | शाखा :- |
| २ | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता :- | |
| ३ | भ्रमणध्वनी क्रमांक :- | |
| ४ | विद्यार्थ्याचा धर्म व जात | |
| ५ | (अ) विद्यार्थ्यांची जन्म तारीख :-<br>(ब) दि.१ मे, २०२४ रोजीचे वयः- | |
| ६ | विद्यार्थ्याचा ई-मेल :- | |
| ७ | विद्यार्थ्याचा आधार (AADHAR) क्रमांक/नोंदणी क्रमांकः- (प्रत जोडावी) | |

| | | |
|---|---|---|
| ७ | विद्यार्थ्यांचा PAN क्रमांक:- | |
| ८ | महाराष्ट्र राज्याचा रहिवास आहे काय ? | |
| ९ | शैक्षणिक स्थिती/पात्रता माहिती-टिप-CGPA/GPA Conversion प्रमाणपत्राचे आधारे टक्केवारी नमुद करणे व ते जोडलेले नसल्यास अपात्र ठरविण्यात येईल. | |

| परीक्षेचे नांव | उत्तीर्ण अभ्यासक्रमा चे नांव | परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | उत्तीर्ण झालेल्या शैक्षणिक संस्थेचे नांव व विद्यापीठाचे नांव | विद्यापीठाचे एकूण गुण | प्राप्त केलेले गुण | गुणांची टक्केवारी Grade/GPA etc. असल्यास टक्केवारी दर्शविलेले प्रमाणपत्र जोडणे |
|---|---|---|---|---|---|---|
| SSC | | | | | | |
| HSC/ Diploma | | | | | | |
| पदवी | | | | | | |
| पदव्युत्तर / पदवी | | | | | | |
| GRE/ GMAT | | | | | | |
| TOEFL/ IELTS | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| १० | (अ) विद्यार्थ्याचा व्यवसाय<br>(ब) नोकरी करीत असल्यास नोकरीचा तपशील<br>(क) हुद्दा/पदनाम<br>(ड) अर्जदारास व्यवसाय/नोकरीमधून मिळणारे वार्षिक उत्पन्न (पुरावा जोडावा)<br>(इ) नोकरी करीत असल्यास कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र जोडले आहे काय? | |
| | (फ) विद्यार्थ्यांच्या कार्यालयाचा संपुर्ण पत्ता:- | |
| | (ह) विद्यार्थ्यांच्या कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांकः- | |
| | (ग) विद्यार्थ्यांच्या कार्यालयाचा ई मेल:- | |
| ११ | (अ) वैवाहिक स्थिती-(लागू असलेल्या ठिकाणी खुण<br>करावी) | विवाहित/अविवाहित/विधवा/घटस्फोटीत/परित्यक्ता/पतीपासून विभक्त |
| | (ब) विवाहीत असल्यास पती किंवा पत्नीचे व मुलांची नावे, वय, व उमेदवाराशी नाते | १.<br>२.<br>३. |
| | (क) विवाहित उमेदवारांच्या बाबतीत<br>(i) पती/पत्नीचे नाव व संपूर्ण रहिवास पत्ता | |

| | | |
|---|---|---|
| | (ii) पती/पत्नीचे व्यवसाय/नोकरी करत असलेल्या ठिकाणाचे नाव,पदनाम व नोकरीच्या ठिकाणाचा पत्ता<br>(iii) पती/पत्नीचे आधार कार्ड व पॅन कार्ड क्र (प्रत सोबत जोडावी)<br>(iv) मुले शिकत असल्यास त्यांचे जन्मदाखले (प्रत जोडावी)<br>(v) त्यांना परदेशात सोबत घेवून जाणार का? | |
| | (ड) विधवा/घटस्फोटीत/परित्यक्ता/पतीपासून विभक्त असलेल्या महिला उमेदवार वडीलांकडे राहत असल्यास व त्यांचे उत्पन्न प्रमाणपत्र व विधवा/घटस्फोट/परित्यक्ता/पतीपासून विभक्त असल्याचे कायदेशीर कागदपत्रांचा तपशील (प्रत जोडावी) | |
| १२ | विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न भारतातील बँक खात्याची माहिती-<br>१. खातेदाराचे नाव-<br>२. बँकेचे नाव-<br>३. बैंक शाखेचे नाव-<br>४. खाते क्र.-<br>५.IFSC क्र.-<br>६.MICR क्र.- | |
| १३ | पासपोर्ट क्रमांक-<br>जारी दिनांक-<br>वैधता दिनांक- | |
| १४ | अ. विद्यापीठाचे ऑफर लेटर क्र. व दिनांक- | |
| | ब. ऑफर लेटर विनाअट/अटीसहीत (नमूद करावे) | |
| | क. ऑफर लेटर अटीसह असल्यास कोणती अट आहे? ते नमूद करावे. | |
| | ड. ऑफर लेटरमधील अभ्यासक्रम | |
| | इ. ऑफर लेटर निर्गमित करणाऱ्या अधिकारी यांचे नाव व पदनाम | नाव:<br>पदनाम: |
| १५ | यापुर्वी आपण राज्य किंवा केंद्र शासनाच्या परदेश शिष्यवृत्तीचा लाभ घेतला आहे काय ?<br>i)असल्यास वर्ष-<br>ii)परदेशातील शैक्षणिक संस्थेचे नाव व देश-<br>iii) अभ्यासक्रमाचे नाव-<br>iv) अभ्यासक्रमाचा कालावधी-<br>v) मिळालेली शिष्यवृत्तीची रक्कम- | |

| | | |
|---|---|---|
| (ब) अर्जदाराच्या पालकांची सर्वसाधारण माहिती:- | | |
| १ | (अ) विद्यार्थ्यांच्या पालकाचे संपूर्ण नांव:- | |
| | (ब) पालकांचा निवासस्थानाचा पूर्ण पत्ता:- | |
| | (क) संपर्काचा दूरध्वनी क्रमांक:- | |
| | (ड) (एस.टी.डी. कोडसह / मोबाईल क्रमांक) | |
| | (ई) ई-मेल पत्ता:- | |
| २ | (अ) विद्यार्थ्यांचा पालकांचा व्यवसाय<br>(ब) पालक नोकरी करीत असल्यास नोकरीचा तपशील<br>(क) हुद्दा/पदनाम<br>(ड) पालकांस व्यवसाय/नोकरीमधून मिळणारे वार्षिक उत्पन्न (पुरावा जोडावा) | |
| | (ब) पालकांच्या कार्यालयाचा पत्ता:- | |
| | (क) कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक:- (एस.टी.डी कोडसह) | |
| | (ड) कार्यालयाचा ई-मेल पत्ता:- | |
| (क) कुटुंबाचे सर्व मार्गानी मिळुन एकत्रित वार्षिक उत्पन्नाबाबतची माहिती:- | | |
| १ | कुटुंबातील सर्व व्यक्तीचे सन २०२३-२४ मधील सर्व मार्गाने मिळणारे एकूण उत्पन्न:-<br>(यामध्ये विद्यार्थी व कुटुंबात इतर व्यक्ती नोकरी अथवा व्यवसाय करीत असल्यास त्यांचे एकत्रित उत्पन्न उत्पन्नाच्या दाखल्यात नमूद करावे व त्याबाबतचे आयकर विवरणपत्र अर्जासोबत सादर करावे. वडील हयात नसल्यास तसा अर्जात उल्लेख करुन मृत्युचा दाखला जोडणे आवश्यक आहे किंवा विभक्त असल्यास तसे अर्जात नमूद करुन त्याबाबतचे न्यायालयाचे कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.) | १. एकत्रित वार्षिक उत्पन्न रुपये<br>______________<br>________जोडलेले आहे / नाही<br><br>२. आयकर विवरणपत्र<br>______________________<br>जोडलेले आहे / नाही.<br><br>३. वडील हयात नसल्यास मृत्युवा दाखला जोडलेला आहे/नाही.<br><br>४. आई वडील विभक्त असल्यास न्यायालयाचे संबंधित कागदपत्र जोडलेले आहे/ नाही. |
| (ड) विद्यार्थ्याच्या कुटुंबाची माहिती :- विद्यार्थ्याच्या माहितीसह (सोबत राशनकार्ड आवश्यक) | | |
| | विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचा तपशील:- | |

| | अ.क्र. | संपूर्ण नांव | वय | विद्यार्थ्याशी असलेले नाते | व्यवसाय | एकुण वार्षिक उत्पन्न | यापूर्वी राज्य/केंद्र शासनाच्या परदेश शिष्यवृत्तीचा लाभ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | घेतलेला आहे का? |
| | १ | | | स्वतः | | | |
| | २ | | | | | | |
| | ३ | | | | | | |
| | ४ | | | | | | |
| | ५ | | | | | | |
| | ६ | | | | | | |
| | ७ | | | | | | |
| | ८ | | | | | | |
| | | | | एकूण वार्षिक उत्पन्न | | | |

| | | |
|---|---|---|
| २ | विद्यार्थी वगळून कुटुंबातील इतर व्यक्तीने परदेश शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेतला असल्यास:- | |
| | i. प्रवेशाचे वर्ष- | |
| | ii. प्रवेश घेतलेले विद्यापीठ व देशाचे नाव- | |
| | iii. महाराष्ट्र शासन-केंद्र शासन किंवा इतर राज्य | |

(इ) परदेशातील शैक्षणिक संस्थेतील/विद्यापीठातील प्रवेशाबाबत माहिती:-

| | | |
|---|---|---|
| १ | (अ) विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या परदेशातील विद्यापीठाचे नांव:- | |
| | (ब) QS World University Ranking सन मे, २०२४ चे नमूद करावे | |
| | (क) विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाचे नाव:- | |
| | (ड) अभ्यासक्रमाचे स्वरुप (पुर्णवेळ /अर्धवेळ/online/ Executive) यापैकी कोणता ते नमूद करावे. | |
| | (इ) अभ्यासक्रमाचा किमान कालावधी:- | |
| | (फ) विद्यापीठ प्रवेश दिनांक:- | |
| | (ग) परदेशातील विद्यापीठाच्या पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता:- | |
| | (घ) परदेशातील विद्यापीठाचा दूरध्वनी क्रमांक (ISD कोडसह) :- | |
| | (ह) परदेशातील विद्यापीठाचा ई-मेल:- | |

(फ) ऑफर लेटरनुसार परदेश शिक्षणासाठीचा खर्च:-

| | | | |
|---|---|---|---|
| १ | विद्यार्थ्याने परदेशातील अभ्यासक्रमासाठी भरलेल्या / भरावयाच्या फी (शुल्क) चा तपशील | एका वर्षाचा खर्च | संपूर्ण अभ्यासाक्रमाचा खर्च |

| | | विदेशी चलनात | भारतीय चलनात (₹) | विदेशी चलनात | भारतीय चलनात (₹) |
|---|---|---|---|---|---|
| | शिक्षण फी-<br>परीक्षा फी-<br>नोंदणी फी-<br>जेवणाचा / राहण्याचा खर्च-<br>विमा खर्च-<br>व्हिसा खर्च -<br>अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेला इतर खर्च (तपशील जोडावा) | | | | |
| | एकूण सर्व खर्च | | ₹ | | ₹ |
| २ | विद्यार्थ्याला खालीलपैकी मंजूर झालेल्या/प्राप्त होणाऱ्या बाबींचा तपशील-<br>१. विद्यापीठातील इतर शिष्यवृत्ती<br>२. Fellowship<br>३. Graduate Teacher Assistance ship<br>४. इतर मानधन<br>५. Campus job/library | | | | |

आम्ही असे जाहीर करतो की, वर सादर केलेली सर्व माहिती संपूर्णतः सत्य आहे ही माहिती खोटी आढळल्यास अर्जदार सदर शिष्यवृत्तीस अपात्र ठरेल. तद्वतच या योजनेशी संबंधीत शासन निर्णयातील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहील. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके, अटी व शर्ती मला बंधनकारक असतील. मी अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांकरिता परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी परदेश शिष्यवृत्ती योजना या योजनेतील शासन निर्णय व नियमावली वाचली असून त्यामध्ये नमूद सर्व भाग, प्रतिज्ञापत्र, ना हरकत पत्र, Surety Bond व इतर आवश्यक बंधपत्रे व हमीपत्रे सादर करण्यास हरकत नाही व ती सर्व मी सोबत सादर करीत आहे. सदर शासन निर्णय दि. २३.११.२०२३ मधील "कर्तव्यात कसुर" हा परिच्छेद मी वाचून समजून घेतला आहे व तो मला मान्य असून मी सर्व बाबींचे पालन करीन व भारत देशाची कोणत्याही प्रकारची नामुष्की परदेशात होईल असे गैरवर्तन वा गैरकृत्य मी करणार नाही, याबाबत याद्वारे मी हमी देत आहे. माझी निवड झाल्यास मी तात्काळ परदेशातील भारतीय दुतावासाशी संपर्क करुन तेथे माझी नोंदणी करुन ती आपणास त्वरीत सादर करेन.

ठिकाण : पालकाची सही : विद्यार्थ्याची सही :

दिनांक : / /२०२४ पालकाचे नांव : विद्यार्थ्याचे नांव

## परिशिष्ट- ब

(टिप- निवडीनंतर सादर करावयाचे आहे.)

(रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपर वर करणे)

**अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांकरिता विशेष अध्ययन करण्यासाठी परदेशी शिष्यवृत्ती योजनेसाठीचे**

**(सन २०२४-२५)**

**-हमी पत्र-**

१. मी ------------------------------------------------------------------------------------------- राहणार --------------------------------------- ------------------------------------------------------------------------------------------------- येथे राहत असून माझी महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागामार्फत अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांकरिता विशेष अध्ययन करण्यासाठी परदेशी शिष्यवृत्ती योजने अंतर्गत परदेशातील (देशाचे नाव) ------------------------------------------ येथे (विद्यापीठाचे नाव) --------------- ------------------------------------------------- या विद्यापीठात (कालावधी) ----------वर्षाच्या (अभ्यासक्रमाचे नाव) ---------------- ------------------------------------------------------ या अभ्यासक्रमासाठी सन --------------------- या वर्षाकरिता परदेश शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे. त्या अनुषंगाने मी आयुक्त समाज कल्याण पुणे यांना खालीलप्रमाणे हमी देत आहे.

२. मी सद्यस्थितीत ---------------------------------------------- येथे नोकरीस असून सदर कार्यालयातील प्रशासकीय बाबी उदा. रजा, वेतन आणि इतर सेवेच्या बाबी या स्वतः प्रत्यक्षपणे निराकरीत करेल यासाठी कोणत्याही प्रकारची सवलत शासनाकडून घेणार नाही. (नोकरी करणाऱ्यांसाठी लागू)

३. अर्जात नमुद केलेला अभ्यासक्रम विहीत कालावधीत पुर्ण करणे माझ्यावर बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रम पुर्ण करण्यासाठी **वाढीव कालावधीची मागणी करणार नाही.**

४. मला शासनाने मंजूर केलेल्या परदेशातील विद्यापीठ व शैक्षणिक अभ्यासक्रमात मी परस्पर बदल करणार नाही.

५. अर्जासोबत सादर केलेले कागदपत्रे / प्रमाणपत्रे हे खोटे व बनावट असल्याचे आढळून आल्यास शिष्यवृत्ती पोटी मिळालेली सर्व रक्कम व्याजासह परत करण्याची हमी देत आहे.

६. कोणत्याही कारणास्तव अभ्यासक्रम अर्धवट सोडल्यास शासनातर्फे मला अदा करण्यात आलेली शिष्यवृत्तीची सर्व रक्कम व्याजासह कुटुंबाच्या मालकीच्या / जामिनदार यांच्या स्थावर मालमत्तेमधून एक रकमी भरपाई करण्याची अथवा वसुल करण्याची हमी देत आहे.

७. परदेशामध्ये शिक्षण घेत असतांना काही कारणास्तव राज्य शासनाच्या पुर्व परवानगीने परदेशातून भारतात काही कालावधीसाठी वास्तव्य केले असेल तर सदर कालावधीची शिष्यवृत्तीची रक्कम मला अनुज्ञेय होणार नाही.

८. परदेश शिष्यवृत्ती अंतर्गत परदेशात शिक्षण घेत असताना जास्तीची रक्कम शासनातर्फे मला अदा झाली असल्याचे निदर्शनास आल्यास त्याची परतफेड करेन अथवा न केल्यास ती वसुल करणेबाबत प्रचलित कायदे व नियमानुसार कार्यवाहीस मी पात्र असेन.

९. मला शिक्षण फी व इतर फी, निर्वाह भत्ता व आकस्मिक खर्च यासाठी शासनाने निर्धारित केलेल्या दरापेक्षा कोणताही जास्तीचा खर्च अनुज्ञेय होणार नाही. निर्धारित दरापेक्षा होणारा जास्तीचा खर्च मी स्वतः अदा करेन.

१०. परदेशातील प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमामध्ये प्रत्येक वेळी उत्तीर्ण होणे माझ्यावर बंधनकारक असून तसे शैक्षणिक संस्था/विद्यापीठाचे प्रमाणपत्र गुणपत्रिका, प्रगती अहवाल प्रत्येक सत्रासाठी किंवा सहा महिन्यांसाठी आयुक्तालयास सादर करेन.

११. कोणतेही कारण अथवा सबबी सांगून अभ्यासक्रम पूर्ण न करणे, विहीत प्रयोजनासाठी खर्च न करणे, खर्चात काटकसर न करणे, विहीत लाभ मर्यादेपेक्षा जास्तीची मागणी परदेशात जावून करणे, कोणत्याही प्रकारचा दबाव आणणे किंवा धमकी देणे, परदेश शिष्यवृत्ती नियमावलीतील तरतूदींचे उल्लंघन करणे, परदेशातील नियम/अटी/तरतूदींचे उल्लंघन करणे, वाममार्गास लागणे, परदेशातील शैक्षणीक कालावधीत कोणत्याही प्रकारचे गैरकृत्य करणे व त्यासाठी दंड शिक्षा होणे, भारतीय राष्ट्रीयत्वास हानी पोहचवणे, भारताची बदनामी करणे या बाबी कर्तव्यातील कसूर समजण्यात येतील, कर्तव्यात कसूर केल्यास मला अपात्र ठरवून माझ्या परदेशी शिक्षणासाठी शासनाने दिलेले सर्व लाभ माझ्याकडून व्याजासह वसूल केले जातील.

१२. परदेशातील अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर मी भारतात येवून माझ्या ज्ञानाचा उपयोग देशासाठी करेन.

१३. उपरोक्त नमूद केलेला सर्व मजकुर मला मान्य असून तो मी वाचून समजून घेऊन आज दिनांक- / /२०२४ रोजी -------मुक्कामी सही केली असे वरील बाबींचे माझ्याकडून उल्लंघन झाल्यास मी भारतीय दंड संहिता कलम १९३(२), १९९, २०० व ४०६ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

स्थळ :

दिनांक : / /२०२४

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सही<br>(विद्यार्थी) | (फोटो) | सही<br>(पालक) | (फोटो) | सही<br>(जामीनदार) | (फोटो) |
| संपूर्ण नांव व पत्ता<br>दूरध्वनी क्र./ मो.क्र | | संपूर्ण नांव व पत्ता<br>दूरध्वनी क्र./ मो.क्र | | संपूर्ण नांव व पत्ता<br>दूरध्वनी क्र./ मो.क्र | |

**महाराष्ट्र राज्यातील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था(टीआरटीआय), पुणे,डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे, छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), पुणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर व महाराष्ट्र संशोधन व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), मुंबई व इतर तत्सम स्वायत्त संस्थामार्फत कार्यान्वित असलेल्या अथवा करण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती, प्रशिक्षण, कौशल्य विकास व विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या परदेश शिष्यवृत्ती या योजनेमध्ये आवश्यक समानता आणण्याकरीता सर्वंकष धोरण निश्चित करणे बाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**शासन निर्णय क्र.सान्यावि-२०२४/प्र.क्र.७७/बांधकामे**
पहिला मजला, मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २५ जुलै, २०२४

वाचा:-

१. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.सान्यावि-२०२३/ प्र.क्र.६०(४)/बांधकामे, दि. ३०.१०.२०२३
२. शासन शुध्दीपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.सान्यावि-२०२३/ प्र.क्र.६०(४)/बांधकामे, दि. ०९.११.२०२३
३. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र इबीसी-२०१७/ प्र.क्र.२८८/शिक्षण-१, दि.२७.६.२०१७
४. शासन निर्णय, नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.सारथी २०२२/प्र.क्र२८९/का.१४२५-अ, दि.२०.०७.२०२३
५. शासन निर्णय, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग शासन निर्णय क्रमांक : शिवृत्ती-२०१८/प्र.क्र.११८/ शिक्षण, दि.११ ऑक्टोबर,२०१८
६. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक :संकीर्ण २०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४ दि.०४ ऑक्टोबर,२०१८
७. शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.१५२२ / प्र.क्र१२ (भाग-१)/का.१२ दि.०७ मार्च २०२४
८. शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्र.अविवि २०१९ / प्र.क्र २११ /का-६ दि.२३ नोव्हेंबर २०२३
९. मा.मंत्रिमंडळाचा दि.११.०७.२०२४ रोजीचा निर्णय.

**प्रस्तावना:-**

मा.मंत्रिमंडळाच्या दि.१९.१०.२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार सामाजिक न्याय विभागाच्या दि.३०.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय),पुणे,डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे, छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), पुणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर व महाराष्ट्र संशोधन व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), मुंबई व इतर तत्सम स्वायत्त संस्थामार्फत कार्यान्वित असलेल्या तसेच, भविष्यात प्रस्तावित करण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती, अधिछात्रवृत्ती, वसतिगृह व वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारा निर्वाह भत्ता,स्वाधार,स्वयंम अशा विविध प्रकारच्या योजनांमध्ये एकसमानता रहावी यासाठी सर्वंकष धोरण निश्चित करण्यात आले आहे. याकरीता अ.मु.स.(वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे कायमस्वरूपी समिती गठीत करण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव, वित्त विभाग | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग | सदस्य |
| ३ | अपर मुख्य सचिव, इ.मा.ब.क. विभाग | सदस्य |
| ४ | अपर मुख्य सचिव, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| ५ | प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग | सदस्य |
| ६ | प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विभाग | सदस्य |
| ७ | सचिव, सा.न्या. व वि.स. विभाग | सदस्य सचिव |

३. दि.३०.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आलेल्या अधिछात्रवृत्ती व परदेशी शिष्यवृत्तीच्या निकषांमध्ये बदल करण्याची मागणी गेल्या काही दिवसांपासून बार्टी,सारथी,महाज्योती,टीआरटीआय इत्यादी स्वायत्त संस्था व संबंधित विभागाच्या विद्यार्थी संघटनांकडून करण्यात येत आहे. तसेच विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या परदेश शिष्यवृत्तीच्या निकषांमध्ये बदल करण्याची मागणी विविध लोकप्रतिनिधी व विद्यार्थी संघटना यांचेमार्फत करण्यात येत आहे. उपरोक्त मागण्यांच्या संदर्भात अधिछात्रवृत्ती व परदेश शिष्यवृत्ती यांमध्ये बदल करणेबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

दि.३०.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आलेल्या अधिछात्रवृत्ती व परदेश शिष्यवृत्तीच्या निकषांमध्ये बदल करण्याची मागणी गेल्या काही दिवसांपासून बार्टी,सारथी,महाज्योती,टीआरटीआय इत्यादी स्वायत्त संस्था व संबंधित विभागाच्या विद्यार्थी संघटनांकडून करण्यात येत आहे. तसेच विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या परदेश शिष्यवृत्तीच्या निकषांमध्ये बदल करण्याची मागणी विविध लोकप्रतिनिधी व विद्यार्थी संघटना यांचेमार्फत करण्यात येत आहे. त्यानुषंगाने, मा.मंत्रिमंडळाच्या दि.११.०७.२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार अधिछात्रवृत्ती व परदेश शिष्यवृत्ती या योजनांच्या निकषांमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**(अ) अधिछात्रवृत्ती –**

१. दि.३०.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयापूर्वी बार्टी- (प्राप्त अर्ज- ७६३), सारथी (प्राप्त अर्ज १३२९), महाज्योती (प्राप्त अर्ज १४५३) या संस्थांमार्फत देण्यात आलेल्या अधिछात्रवृत्ती जाहिरातींनुसार आलेल्या अर्जांमधील कागदपत्रांची पडताळणी करून व शपथपत्र घेऊन एकूण ३५४५ संशोधक विद्यार्थ्यांपैकी पात्र संशोधक विद्यार्थ्यांना ५० टक्के दराने सरसकट अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. बार्टी, सारथी, महाज्योती या संस्थांमार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती करीता निश्चित करण्यात आलेली मर्यादा २०० वरून ३०० इतकी करण्यात येत आहे. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था या संस्थेमार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती करीता निश्चित करण्यात आलेली मर्यादा १०० वरून २०० इतकी करण्यात येत आहे.

३. यु.जी.सी. (University Grants Commission) मार्फत विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे.

४. यु.जी.सी. (University Grants Commission) मार्फत विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार Date of Award पासून फेलोशिपचा लाभ देण्यात यावा.

**(ब) परदेश शिष्यवृत्ती:-**

परदेश शिष्यवृत्ती योजना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, अल्पसंख्यांक विकास विभाग, नियोजन विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग या विभागांमार्फत स्वतंत्रपणे राबविण्यात येत आहे. या सर्व विभागांच्या परदेश शिष्यवृत्ती योजनेत एकवाक्यता येण्याच्या उद्देशाने सदर योजनेच्या निकषांमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. शैक्षणिक अर्हता- परदेशातील पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठांमधून किमान ५५ टक्के गुणांसहीत पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी. तसेच पीएच.डी.अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठांमधून किमान ५५ टक्के गुणांसहीत पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

२. परदेशातील शैक्षणिक संस्थेने Offer Letter मध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक कालावधीसाठी लागू केलेली संपूर्ण शिक्षण फी ही संबंधित यंत्रणेने थेट संबंधित शैक्षणिक संस्थेस अदा करावी .

३. एकाच कुटूंबातील कमाल पात्रता धारक :-

(अ) परदेश शिष्यवृत्ती योजनेचा लाभ एका विद्यार्थ्यास फक्त एकदाच घेता येईल. मात्र, या योजनेअंतर्गत पदव्युत्तर पदवीचा अभ्यास सुरु असतांना त्या विद्यार्थ्यास डॉक्टरेट पदवी (पीएच.डी) साठी शासन निर्णयात अंतर्भूत विषयांत दर्जावाढ करण्याची संधी मिळाल्यास सदर विद्यार्थी याच योजनेअंतर्गत पुढील अभ्यासक्रमासाठी लाभ घेण्यास पात्र असेल. त्यासाठी विद्यार्थ्याने निवड समिती/शासनास रितसर अर्ज करून मान्यता घेणे बंधनकारक राहील. अशा प्रकरणात संबंधित शैक्षणिक संस्थेची जागतिक क्रमवारी (QS World Ranking) त्यावेळी लागू

असलेल्या शासन निर्णयाच्या मर्यादेत असणे आवश्यक आहे. मात्र अशा प्रकरणात विद्यार्थ्यास मिळणारा एकूण लाभाचा कालावधी त्यावेळी लागू असलेल्या शासन निर्णयाच्या मर्यादेतच दिला जाईल. उदा.विद्यार्थ्याने दोन वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम करतांना डॉक्टरेट (पीएच.डी) करण्यासाठी परदेशी शैक्षणिक संस्थेत दर्जावाढ प्राप्त केली तर त्या विद्यार्थ्याला शासनाने विहित प्रक्रियेद्वारे मान्यता दिल्यास त्यानंतरच्या पुढील दोन वर्षासाठी शासन निर्णयातील नमूद सर्व लाभ घेता येतील. या कालावधी नंतर होणारा पुढील संपूर्ण खर्च मात्र विद्यार्थ्याला करावा लागेल.

(आ) एकाच कुटूंबातील जास्तीत जास्त दोन मुलांना परदेश शिष्यवृत्तीचा लाभ देता येईल त्यापेक्षा जास्त मुलांना परदेश शिष्यवृत्ती लागू राहणार नाही. यासाठी पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी तसे प्रतिज्ञापत्र करून देणे बंधनकारक असेल.

(इ) एका वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेत एका कुटूंबातील दोन पाल्यांचा समावेश असल्यास प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम फेरीत जागा रिक्त राहील्यास एका कुटूंबातील दुसऱ्या पाल्यास लाभ देण्यात येईल.

४. **विद्यार्थी निवडीचे निकष**: एकदा किमान शैक्षणिक अर्हता निश्चित केल्यावर विद्यार्थ्याच्या केवळ भविष्याच्या अनुषंगाने अधिक लाभ मिळू शकेल या दृष्टीने त्या वर्षीच्या QS World Ranking ची गुणवत्ता क्रमवारी लक्षात घेऊन विद्यार्थांची गुणवत्ता यादी बनवावी. दोन किंवा अधिक विद्यार्थ्यांची विद्यापीठाची क्रमवारी समान असल्यास अशा प्रसंगी त्यांच्या लगतच्या पदवी परीक्षेची गुणवत्ता लक्षात घ्यावी.

५. कुटूंबाची उत्पन्नाची वार्षिक मर्यादा रू.८.०० लक्ष इतकी राहील.

६. परदेश शिष्यवृत्ती बाबत विद्यार्थी निवड प्रक्रिया वेळेच्या शिस्तीत होणे तसेच त्या अनुषंगाने पुढील प्रक्रिया शीघ्रतेने होणे गरजेचे असल्याने त्याबाबत सर्व निर्णय त्या विभागाच्या सचिव स्तरावर घेण्यात यावे.

७. निवड प्रक्रियेची निकड लक्षात घेता विद्यार्थी पुर्ण क्षमतेने उपलब्ध न झाल्यास संबंधित विभागास वर्षातून एक पेक्षा अधिक वेळा निवड प्रक्रिया राबविण्याची मुभा राहील. मात्र त्यात विद्यार्थांचे मेरीट डावलले जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

८. आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या परदेश शिष्यवृत्ती योजनेकरीता विहित निकषानुसार विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास कुटूंबाच्या उत्पन्नाची वार्षिक मर्यादा व QS World Ranking ची मर्यादा शिथील करून विद्यार्थ्यास परदेश शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येईल. तथापि, सदर लाभ देतांना उत्पन्नाची वार्षिक मर्यादा रू.८.०० लाखापासून जास्तीत जास्त रू.१०.०० लाखांपर्यंत शिथिल करण्यात यावी. तसेच QS World Ranking ची मर्यादा २०० पासून पुढे चढत्या क्रमाने मंजूर पदे भरेपर्यंत ग्राह्य धरण्यात यावी.

९. अल्पसंख्यांक विभागाच्या परदेश शिष्यवृत्तीची विद्यार्थी संख्या २७ वरून ७५ एवढी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१०. विद्यार्थ्यास खालील बाबींवर होणाऱ्या खर्चाचा भार हलका व्हावा म्हणून दरवर्षी यु.एस.ए. व इतर देशांसाठी (यु.के. वगळून) १५०० युएस डॉलर, आणि यु.के. साठी ११०० जीबीपी इतका निर्वाह भत्ता /इतर खर्च/ आकस्मिक खर्च म्हणून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

- आवश्यक ती क्रमिक पुस्तके

- वह्या व स्टेशनरी
- प्रबंध अहवाल तयार करणे
- टायपिंग बायडींग
- स्थानिक भेटी व इतर अभ्यास सहली प्रवास खर्च
- प्रबंधासाठी आवश्यक खर्च
- इतर प्रासंगिक खर्च

११. विद्यार्थ्याची अर्हता, उत्पन्न मर्यादा, निवडीचे निकष, निवड पद्धती, तसेच विद्यार्थ्यास मिळणारे आर्थिक लाभ तसेच शिष्यवृत्तीच्या लाभार्थ्यांची संख्या याबाबत बदल करावयाचे असल्यास दि. ३० ऑक्टोबर २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार अ.मु.स.(वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या कायमस्वरूपी समितीने निर्णय घ्यावा.

**(क)महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) संस्थेचा वार्षिक कृती आराखडा सन २५-२०२४:-**

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) या संस्थेने सन २०२४-२५ या वर्षाकरीता सादर केलेला रू.४५३.६६ कोटी इतक्या रकमेच्या वार्षिक कृती आराखड्यास अर्थसंकल्पीय तरतूदीच्या रू.३००.०० कोटीच्या मर्यादेत चालू आर्थिक वर्षी मान्य करून उर्वरित रू.१५३.६६ कोटी इतक्या रकमेस पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अधीन राहून यावर्षी मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**(ड)** सर्वंकष एकसमान धोरणाच्या अनुषंगाने सादर करण्यात येणाऱ्या सर्व प्रस्तावांबाबत अ.मु.स.(वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील गठीत समितीने सात दिवसात बैठक घेऊन निर्णय घ्यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०७२५१५४६१३०७२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने .

SOMNATH
NAMDEO BAGUL

Digitally signed by SOMNATH NAMDEO BAGUL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, [illegible], postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=[illegible], cn=SOMNATH NAMDEO BAGUL
Date: 2024.07.25 16:40:37 +05'30'

**( सो. ना. बागुल )**
**सह सचिव ,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई, महाराष्ट्र राज्य,
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
३. मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (गृह व विधी) महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
४. मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त व नियोजन) महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
५. मा. विरोधी पक्षनेता विधान सभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
६. मा. मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव,

७. मा. राज्यमंत्री ( सा.न्या.) यांचे खाजगी सचिव,
८. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
९. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
१०. सर्व सन्माननीय सदस्य, विधान सभा/ विधान परिषद
११. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, महाराष्ट्र राज्य,
१२. मा. अमुस/प्रधान सचिव/सचिव (सर्व) मंत्रालयीन विभाग,
१३. मा. सचिव (सा.न्या. ) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१४. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे,
१५. महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे
१६. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था ,(टीआरटीआय)पुणे,
१७. संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी) पुणे,
१८. संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था ,नागपूर (महाज्योती)
१९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी ,(अमृत)मुंबई
२०. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण,
२१. सर्व सहायक आयुक्त, समाज कल्याण,
२२. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
२३. निवडनस्ती (बांधकामे).